
जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शाळांना सुट्ट्या देण्याचे व्यवस्थापन समित्यांना अधिकार

नगर - जिल्ह्यात २४ महसुल मंडळांमध्ये अतिवृष्टी झालेली असून पुरपरिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे स्थानिक परिस्थिती पाहून शाळांना सुट्ट्या देण्याचे अधिकार ग्रामस्तरावरील शालेय व्यवस्थापन समित्यांना देण्यात आले आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी काढले आहेत.

जिल्ह्यात गेल्या २ दिवसांपासून मुसळधार पाऊस होत आहे. तसेच २२ व २३ सप्टेंबर रोजीही हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा दिलेला आहे. या पावसामुळे पुरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी धोका निर्माण होवू शकतो त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून ग्रामस्तरीय शालेय व्यवस्थापन समित्यांनी स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन शाळांना सुट्ट्या देण्याचा निर्णय घ्यावा तसेच या काळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात कामकाज करावे असे या आदेशात म्हटले आहे.

## लखमीचंद जगड यांचे हृदयविकाराने निधन



नगर -चितळे रोड येथील रहिवासी महेंद्र पेढावालाचे संचालक लखमीचंद जगड (लखुशेठ, वय ७८) यांचे २२ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. राजु जगड यांचे ते चुलते होत.

## अनिल चोटीले यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - येथील महात्मा कॉलनीतील रहिवासी अनिल वसंत चोटीले (वय ५१) यांचे २२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्य पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे वडील, २ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## उर्मिलाबाई पटारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पाईपलाईन रोड येथील रहिवासी सौ. उर्मिलाबाई सुधाकर पटारे (वय ७५) यांचे २१ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. २२ सप्टेंबर रोजी नालेगाव अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अॅड. लक्ष्मीकांत पटारे यांच्या त्या मातोश्री होत.

## दिया मुथ्था यांचे संथारा व्रतात निर्वाण



नगर - सारसनगर येथील ओम कॉलनी येथील रहिवासी दिया नितीन मुथ्था (वय १९) यांचे २२ सप्टेंबर रोजी संथारा व्रतात निर्वाण झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, आजी, १ बहीण, चुलता, चुलती असा परिवार आहे.

## समर्थ शेळके यांचे आकस्मिक निधन



शेवगाव - येथील रहिवासी समर्थ शिवाजी शेळके (वय २९) २० सप्टेंबर रोजी आकस्मित निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार शेवगाव अमरधाम करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, आई, वडील, आजी, चुलते, चुलती असा परिवार आहे. ते खंडोबानगर येथील समर्थ इलेक्ट्रीकल्स् रिपेरिंगचे संचालक होते.

## कुसुमबाई शिंदे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - वंजारगल्लीतील रहिवासी कुसुमबाई मुरलीधर शिंदे (वय ८५) यांचे २० सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मिलिंद, मनिष आणि मनोज शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.



नगर शहर परिसरात २१ सप्टेंबर रोजी रात्रभर झालेल्या पावसामुळे सीना नदीला आलेला पूर.



नगर बायपास रस्त्यावर सारोळाबद्धी शिवारात साचलेले पावसाचे पाणी.

# नगर शहरासह जिल्ह्यात सलग २ दिवस पावसाचे थैमान, जनजीवन विस्कळीत

## सीना नदीला आठवड्यात तिसऱ्यांदा पूर, नगर कल्याण रोडवरील वाहतूक झाली ठप्प

नगर - नगर शहरासह जिल्ह्यात गेल्या २ दिवसांत पावसाने चांगलेच थैमान घातले आहे. २० सप्टेंबरला रात्री झालेल्या मुसळधार पावसानंतर २१ सप्टेंबरला तर रात्रभर पाऊस कोसळत होता. त्यामुळे नगर - कल्याण महामार्गावरील सीना नदीला ७ दिवसात तिसऱ्यांदा पूर आला त्यामुळे वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली होती. जिल्ह्याच्या अनेक भागातही नदी, नाले तुडुंब भरून वाहत असून शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचलेले आहे. दरम्यान, पुढील काही दिवस भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जारी केलेला आहे.

२० सप्टेंबरला रात्री ८ वाजेपासून पुन्हा पावसाला सुरुवात झाली. शहराच्या बहुतेक भागात या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. रात्री आठ वाजेच्या सुमारास शहरात मुसळधार पावसाला सुरुवात झाली. नालेगाव, बोल्हेगावसह सावेडी उपनगरात जोरदार पावसाने झोडपून काढले. आधीच खड्डे असलेल्या मार्गावर वाहने चालवताना जोरदार पावसात वाहनधारकांना कसरत करावी लागली. २१ सप्टेंबरला दिवसभर पावसाने उघडीप दिली. मात्र सायंकाळी ७ च्या सुमारास पुन्हा जोरदार पाऊस सुरु झाला. हा पाऊस रात्रभर कोसळत होता. त्यामुळे सीना नदीला मोठा पूर येवून नगर कल्याण रोडवरील वाहतूक ठप्प झाली होती.

### केडगाव, भिंगार, कापूरवाडी, चास, चिचोंडी पाटील मंडलांत अतिवृष्टी

नगर शहर व तालुक्यात २१ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते २२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजे पर्यंतच्या २४ तासांत शहर व तालुक्यातील १२ महसुली मंडलांच्या पैकी केडगाव (७४.०मिमी), कापूरवाडी (७१.५ मिमी), भिंगार (७२.३ मिमी), चास (७४.०मिमी), चिचोंडी पाटील (७२.० मिमी) या ५ मंडलांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. शासनाच्या नियमानुसार ६५ मिमी किंवा त्या पेक्षा जास्त पाऊस झाल्यास ती अतिवृष्टी समजली जाते.

याशिवाय नालेगाव मंडलात ५७.५ मिमी, नागापूर २१.३ मिमी, सावेडी ५४.०, वाळकी ५५.८, रुईछत्तीसी ३८.३ मिमी, नेप्ती ५३.३ मिमी अशी नगर तालुक्यात सरासरी ५८.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. २१ सप्टेंबर ला सकाळी संपलेल्या २४ तासांत वाळकी ६९.८ मिमी व रुईछत्तीसी ६८.३ मिमी अशी अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

### पाथर्डी, जामखेड मध्ये ही अतिवृष्टी

जिल्ह्यात पाथर्डी (११०.५ मिमी) व जामखेड (६६.१ मिमी) या दोन तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली. याशिवाय नगर ५८.८ मिमी, पारनेर २२.३ मिमी, श्रीगोंदा ४६.७ मिमी, कर्जत ४५.६ मिमी, शेवगाव ५६.९ मिमी, नेवासा २५.० मिमी, राहुरी ५.७ मिमी, श्रीरामपूर ४.८ मिमी, राहाता ६.० मिमी असा पाऊस झाला आहे.

### मान्सूनच्या ११४ दिवसात जिल्ह्यात १०८.३ टक्के पाऊस

मान्सूनच्या ११४ दिवसात जिल्ह्यात १०८.३ टक्के पाऊस झाला. आतापर्यंत ४४३.० मिमी पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, पुढील काही दिवस भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे. जून, जुलै महिन्यात पावसाने पाठ फिरवली होती. त्यानंतर १४ ऑगस्टपासून शहरासह जिल्ह्यात तुरळक व मध्यम स्वरुपाच्या पावसाला सुरुवात झाली होती, मात्र गेल्या आठवड्यात झालेल्या पावसाने गेल्या ३ महिन्यातील तुट भरुन काढली होती. त्यानंतर पुन्हा सलग २ दिवस पाऊस झाल्याने जिल्ह्यात आत्तापर्यंत १०८.३ टक्के पाऊस झाला आहे.

### मे महिन्यातही झाला होता नगर परिसरात २९१.९ मिमी पाऊस

नगर तालुक्यात २७ मे रोजी चास आणि वाळकी मंडलात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला होता. तसेच इतर ठिकाणीही पावसाने हजेरी लावली होती. मे महिन्यात नालेगाव मंडलात १५६.२ मिमी, सावेडी २९६.७ मिमी, कापूरवाडी १९२.३ मिमी, केडगाव ३२३.४ मिमी, भिंगार २९०.६ मिमी, नागापूर २७४.९ मिमी, जेऊर १८८ मिमी, चिचोंडी पाटील २८५.३ मिमी, वाळकी ३८२.८ मिमी, चास ४३०.३ मिमी, रुईछत्तीसी ३३९.८ मिमी, नेप्ती ३४१.२ मिमी. अशी नगर शहरासह तालुक्यात मे महिन्यात सरासरी २९१.९ मिमी पावसाची नोंद झाली होती.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २४ सप्टेंबर पर्यंत 'यलो अलर्ट'

नगर - भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार २२ ते २४ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात वीजांचा कडकडाट, जोरदार वारे व मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

नद्यांच्या विसर्गात वाढ; पूरस्थितीचा धोका पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढला असून त्यामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

सध्या भिमा नदीवर दौंड पूल येथे १०,१९८ क्युसेक, गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून ३,१५५ क्युसेक, प्रवरा नदीवरील निळवंडे धरणातून ७०० क्युसेक, ओझर बंधारा ४,२९९ क्युसेक, मुळा धरणातून ५,००० क्युसेक, घोड धरणातून ३,००० क्युसेक, सीना धरणातून ११,५६० क्युसेक, कुकडी नदीवरील येडगांव धरणातून ३०० क्युसेक, हंगा नदीवरील विसापूर धरणातून १,६०० क्युसेक, खैरी धरण येथून ९,६१३ इतका विसर्ग सुरू आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट सर्व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट सर्व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन व जिल्हा अध्यक्ष सुधीर भद्रे यांनी केली आहे.

जिल्ह्यामध्ये गेल्या दहा दिवसापासून सलग धुवांधार पाऊस पडतो आहे. या पावसामुळे खरीप हंगामातील सर्व पिकांचे, फुल पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. कांद्याची रोपे पूर्णतः वाया गेली आहेत, उडीद पिकाचे जागेवरच दाणे फुगून खराब झाले आहेत. सोयाबीन पूर्णतः पाण्यात असून सोयाबीनचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यामुळे जास्त क्षेत्रावर पेरलेल्या सोयाबीन पिकाच्या उत्पादनामध्ये खूपच घट येऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. कापूस आणि तुरीचे पीक उबळायला लागलेले आहे. बहुतेक सर्वच शेतामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठून अनेक पिके पाण्याखाली बुडालेली आहेत.

बहुतेक सर्वच नद्यांना आणि ओढ्यांना पूर आल्यामुळे पुराचे पाणी शेतात घुसून पीकांचे व शेतीचे नुकसान झालेले आहे. त्याचप्रमाणे अतिरिक्त झालेल्या पावसाचे पाणी शेतात साचून शेतातच तळे निर्माण झाले आहे.

जास्त झालेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर शासनाने कृषी विभाग आणि महसूल विभागाच्या माध्यमातून पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. मात्र पंचनामे करणाऱ्या कृषी आणि महसूलच्या अधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांनाही नदी आणि ओढयांकाठी जाणे धोक्याचे झालेले आहे. तसेच दररोज पडत असलेल्या संततधार पावसा मुळे फक्त नदीच्या आणि ओढ्या काठच्या पिकांचे पंचनामे करण्याऐवजी आता शासनाने पंचनामे न करता सरसकट सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी भारतीय जनसंपदाच्या वतीने करण्यात आलेली आहे.

याचे कारण असे आहे की एक तर दहा ते पंधरा दिवसांपासून सलग पाऊस सुरू आहे. तसेच पंचनामे करताना काही ठराविक शेतकऱ्यांना पंचनामा करून घेण्याची हातोटी असल्यामुळे त्यांना अतिरिक्त मदत मिळते तर ज्यांचे पंचनामे होत नाही त्यांना काहीच मदत मिळत नाही. यामुळे शासन दुजाभाव करते तसेच शासकिय अधिकारी आणि गाव चालविणारी नेते मंडळी सुद्धा दुजाभाव करतात असा शेतकऱ्यांमध्ये समज होतो.

यामुळे शासनाची ही प्रतिमा मलिन होते. त्या ऐवजी अतिरिक्त झालेल्या पावसामुळे सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे केले आणि सर्वांना मदत दिली तर सर्व शेतकरी समाधानी होऊन सर्वांचीच दिवाळी गोड होईल असा आशावाद राज्याध्यक्ष अशोक सब्बन, पोपटराव साठे, आर्किटेक्चर अर्षद शेख, सुनील टाकसाहेब, बाळासाहेब पालवे, राम धोत्रे, अशोक डाके, निवृत्तअभियंता संजय शिंदे, रवी सातपुते, वीरबहादूर प्रजापती, केशव बरकते, वहीद सय्यद, आकाश गायकवाड, बबलू खोसला, अशोक भोसले, राजेंद्र कर्डीले, विक्रम क्षीरसागर, फैरोज शेख, विजय शिरसाठ, नुरखां पठाण, कटारिया व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी व्यक्त केला आहे.





सारोळा कासार येथील हनुमान मंदिरात विटंबनेनंतर शुद्धीकरण व आरती करताना ग्रामस्थ, तर दुसऱ्या छायाचित्रात ग्रामस्थांना शांततेचे आवाहन करताना पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने, स.पो.नि. प्रल्हाद गिते.

# सारोळा कासार मधील हनुमान मंदिरात अज्ञातांकडून विटंबना

## ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप, पोलिसांचा मोठा फौजफाटा गावात दाखल

नगर - नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील ग्रामदैवत पूर्वमुखी हनुमान मंदिरात मूर्तीच्या चौथऱ्यावर पाठीमागील बाजूस अज्ञात समाज कंटकाने मांसाचे तुकडे ठेवून विटंबना केल्याचा प्रकार २२ सप्टेंबर रोजी सकाळी निदर्शनास आला. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरलेले असून पोलिसांनी तातडीने या समाजकंटकांचा शोध घ्यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली. या घटनेनंतर पोलिसांचा मोठा फौजफाटा गावात तैनात करण्यात आला असून गावात तणावपूर्ण वातावरण पसरलेले आहे.

गावच्या वेशीबाहेरच पुर्वामुखी हनुमान मंदिर आहे. या ठिकाणी सकाळी दर्शनाला गेल्यावर हा प्रकार काहींच्या निदर्शनास आला. त्यामुळे गावात संतापाचे वातावरण पसरले, अनेक ग्रामस्थ, तरुण मोठ्या संख्येने मंदिराजवळ जमा झाले. पोलिसांना याबाबतची माहिती दिल्यानंतर नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते हे मोठ्या फौजफाट्यासह गावात दाखल झाले. काही वेळातच नगर ग्रामीणचे पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने हे ही फौजफाट्यासह गावात आले. रॅपीड अॅक्शन फोर्स ची तुकडीही आली. पोलिस अधिकाऱ्यांच्या समोर ग्रामस्थांनी आक्रमक पणे आपल्या संतप्त भावना व्यक्त करत आरोपीला तातडीने पकडण्याची मागणी केली. पोलिस अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना शांततेचे आवाहन करत आम्ही तपास सुरु केला असून आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल असे आश्वासन दिले.

त्यानंतर सारोळा कासार येथील युवक व ग्रामस्थांनी तातडीने मंदिराची स्वच्छता करून शुद्धीकरणाचा विधी केला. श्री हनुमान मूर्तीला पाणी व दुधाने अभिषेक करून आरती, हनुमान चालीसा आदींचे पठण करण्यात आले व मंदिराचे पावित्र्य पुनर्स्थापित करण्यात आले.

पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामस्थांनी शांततेत या घटनेचा निषेध नोंदवला. सारोळा कासार गावात सर्व जातीधर्माचे लोक वर्षानुवर्षे गुण्यागोविंदाने राहात आहेत. गाव सुशिक्षित आहे. परंतु गावात इतिहासात पहिल्यांदाच अशी घटना घडल्याने गावातील शांतता, ऐक्य व बंधुभाव याला बाधा आणण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे हे कृत्य करणाऱ्या समाजकंटकांना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

सेल्फ अॅडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ अॅडेसिव्ह वॉलपेपर,किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईडस्, रोलर ब्लॉईडस्, झेब्रा ब्लॉईडस्, व्हर्टिकल ब्लॉईडस, उडन ब्लॉईडस्, कस्टमाईज ब्लॉईडस्, चीक् ब्लॉईडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ, कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टिफिशियल ग्रास, धुळी पासुन संरक्षणसाठी प्लास्टीक तयार पडदे
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

मानसिक ताण, काळजी यांमुळे ॲसिडीटी वाढते, त्याकरिता या गोष्टींवर नियंत्रण मिळवण्यासाठी मेडिटेशन, रिलॅक्सेशन टेक्निक्स करावे. जागरण टाळावे. किमान साडेसहा ते सात तास झोप घेणे आवश्यक असते.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय एस्पिरीन, सांधेदुखीची औषधे, पेनकिलर्स परस्पर घेऊ नयेत. घाईगडबडीने जेवल्याने अपचन, ॲसिडीटी असे त्रास होतात.

फिटनेससाठी तेलकट आणि चरबीयुक्त पदार्थ आहारातून कमी करा.

यामुळे फॅट तर वाढतातच शिवाय अनेक आजारांनाही आमंत्रण मिळते. जास्त मीठ असणारे पदार्थ म्हणजे सॉस, केचअप, चिप्स, पापड टाळा.

## पाककला

### मिश्र धान्यांच्या चकल्या

**साहित्य :** हरभरे, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मूग, मटकी, चवळी, मसूर, वाल, तूरडाळ, धने, तीळ, ओवा, तिखट, मीठ, काळा मसाला, तेल.

**कृती :** वर दिलेले सर्व धान्ये प्रत्येकी एक वाटी घ्यावेत. सर्व धान्ये भाजून घ्यावीत व एकत्र करून दळावीत. नंतर त्या पिठात एक वाटी तेल तापवून घालावे व ऐक वाटी तीळ, एक वाटी तिखट, हळद व चवीप्रमाणे मीठ व काळा मसाला व थोडा ओवाही घालावा. नंतर त्या पिठात दोन-तीन वाट्या उकळते पाणी घालावे. नंतर ते पीठ गार पाण्यात भिजवून चांगले मळून त्याच्या चकल्या पाडून खरपूस तळून काढाव्यात.

## वास्तू

✽ मुलांची स्टडी किंवा बेडरूममध्ये पूर्वे कडे 'मनिप्लँट' लावावा. शिक्षणात हमखास यश मिळते.

✽ मुख्य दरवाजानुसार विजेचा किंवा सिमेंटचा खांब असणेही अशुभ आहे.

✽ मुख्य दरवाजासमोर तुळस लावावी.

✽ मुख्य दरवाजासमोर दररोज स्वस्तिकची रांगोळी काढावी.

## सल्ला

✽ विंचू डसल्यास डसलेल्या जागी अत्तर लावा. मध, तूप व चुना समप्रमाणात एकत्र मिसळून लावल्यास विष उतरेल.

✽ भाज्या चिरण्यापूर्वी धुऊन घ्याव्यात. यामुळे त्यातील खनिजे व व्हिटॅमिन नष्ट होत नाहीत.

✽ पदार्थ नेहमी मंद आचेवरच शिजवावेत. यामुळे मसाल्यांचा सुगंध टिकून राहातो. पौष्टिक घटक नष्ट होत नाहीत व भाजी स्वादिष्ट होतात.

## सौंदर्य

✽ बोटांवरील सांधे काळे पडले असतील, तर त्यावर लिंबाच्या फोडीवर मीठ लावून चोळावे असे नियमित केल्यास काळेपणा नाहीसा होतो.

✽ रोज झोपण्यापूर्वी व सकाळी आंघोळीपूर्वी संपूर्ण शरीराला बदामाच्या तेलाने मालिश करावे. यामुळे कोरडी त्वचा तजेलदार बनते.

✽ एरंडीचे तेलसुद्धा खूप फायदेशीर आहे. दोन महिने रोज रात्री या तेलाने केसांना मॉलिश केल्यास टक्कल पडत नाही.

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २३ सप्टेंबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, हस्त १३।४०, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील. आपल्या उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : कौटुंबिक जीवन आपल्यासाठी आनंद आणेल, पण खाण्या-पिण्याच्या बाबतीत काळजी घ्या. आरोग्य नरम-गरम राहील. योजनाबद्धरीत्या आपले काम करण्याचा प्रयत्न करा.

**मिथुन** : नवीन कामे, योजनांच्या बाबतीत स्थिती लाभदायक राहील. घरात किंवा कुटुंबात शुभप्रसंग घडतील. छोट्या-छोट्या अडचणी येतील. पण त्याकडे दुर्लक्ष करा.

**कर्क** : शत्रू पराभूत होतील. दृष्टीकोनात बदल केल्याने निश्चितच यश मिळेल. आपली कामे धाडसाने करा. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**सिंह** : मान-सन्मान वाढेल. आनंदाची बातमी मिळेल. आरोग्याची काळजी घ्या. कौटुंबिक वाद-विवाद टाळा.

**कन्या** : व्यापार-व्यवसायात जोखमीचे काम टाळा. नोकरदार कामात व्यस्त राहातील. आरोग्य नरम-गरम राहील.

**तूळ** : व्यापारात वेळ मध्यम राहील. कामात काही विघ्न येऊ शकतात. अधिक जोखमीचे कार्ये टाळा. बाहेरचे खाणे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक** : अधिकाऱ्यांपासून दूर राहा. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. मित्रांचे सहकार्य मिळाल्याने महत्त्वाची कार्य पूर्ण होतील.

**धनु** : राजकीय व्यक्तींना काळ अनुकूल आहे. कौटुंबिक सुख वाढेल. आर्थिक विषयांमध्ये सावध रहा. कौटुंबिक वातावरण आनंददायी असेल.

**मकर** : मागील उधारी-उसनवारी वसुल होईल. दैनंदिन कामात सातत्य राहणार नाही. अस्वस्थता जाणवेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल.

**कुंभ** : व्यापार-व्यवसायात वातावरण अनुकूल मिळेल. मिळकतीपेक्षा अधिक खर्च होईल. आपले काम धाडसाने करा. यंत्रे व उपकरणे जपून हाताळावीत.

**मीन** : पैशासंबंधी येणाऱ्या व अडचणी दूर होतील. आनंदाची बातमी मिळेल. जुने मित्र-मैत्रिणी भेटतील. नुकसान होण्याचा संभव आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२६८

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | | | | | ■ | |
| ■ | ८ | | ■ | | ■ | ९ | |
| १० | | ■ | ■ | ■ | ११ | | |
| | ■ | १२ | १३ | १४ | ■ | १५ | |
| १६ | १७ | | | | १८ | ■ | |
| १९ | | ■ | | ■ | २० | २१ | |
| २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |

**आडवे शब्द :-** १) बुटका माणूस; विष्णूचा पाचवा अवतार ४) मजुरांवर देखरेख करणारा ७) महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री ८) पराजय; माळ; अपयश; माला ९) पाणी; जीवन; नीर १०) अधिक जड; किंमतवान; जड ११) रामायणातील वानरराज वालीचा मुलगा १२) माघारी; परत १५) नाव वगैरे उतरून जाण्याजोगी लहान खाडी; त्याअर्थी १६) कुठेच सरळ नसलेला १९) मोठी टोपली २०) स्वभावसिद्ध; उद्देशवाचून २२) रोख; झोक; ओढा २३) नक्षत्र; चांदणी २४) एक धान्य

**उभे शब्द :-** १) डावा; वाईट २) चित्ताकर्षक ३) पाट; कालवा ४) माजोरी; उन्मत्त ५) वाराणसीचे दुसरे नाव; बनारस ६) मजल करीत करीत ९) दुनिया; विश्व १०) ओझे वाहणारा; हमाल १२) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर १३) सती; साध्वी १४) पाढ्यातील सहाची संज्ञा १७) भयंकर १८) एक कीटक; मच्छर २१) जिवंत राहण्यासाठी एक आवश्यक घटक

### शब्दगंध क्र. ७२६७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | ल्हा | द | के | श | व | अ | त्रे |
| बो | ■ | श | र | ग | ■ | गा | ला |
| ध | ड | क | ■ | न | ■ | प | ■ |
| न | र | ■ | बा | ■ | पै | ■ | ख्या |
| ■ | का | वे | बा | ज | ■ | भा | ग |
| का | ळी | ज | ■ | बा | स | ला | त |
| वे | ■ | ■ | स | ब | ळ | ■ | ■ |
| री | त | स | र | ■ | ई | ब | र |

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अथांग परिश्रमानेच सफलता प्राप्त होत असते; केवळ विचार करीत बसल्याने नव्हे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'मीठा जहर' म्हणजे काय?

गोड बोलून विश्वासघात करणे, म्हणजे काय हे तुम्हाला माहीत आहे. अशीच एक वनस्पती आहे. जिचे मूळ गोड लागते, पण खाल्ल्यास प्राणावर बेतते. या विषाला त्यामुळेच 'मीठा जहर' असे म्हणतात. ॲकोनिटम नॅपेल्स नावाचे हे झाड हिमालयाच्या प्रदेशात आढळून येते. तसे या झाडाचे सर्वच भाग विषारी असतात; परंतु मूळ जास्त विषारी असते. मुळात ॲकोनिटीन हा अत्यंत विषारी असा घटक असतो. हे एक शोभेचे झाड आहे.

पानात वा इतर पदार्थात मिसळून हे विष खायला देतात. यामुळे ओठ, घसा, जीभ बधिर होणे, लाळ सुटणे, पोटात दुखणे, उलट्या होणे, खूप घाम येणे, चक्कर येणे, दृष्टी व वाचा यावर दुष्परिणाम होणे, हातापायातील त्राण जाणे इत्यादी लक्षणे दिसून येतात. अखेर हृदयाच्या स्नायूवर परिणाम होऊन किंवा श्वसन थांबून मृत्यू होतो. १ ग्रॅम वजनाइतके मूळ वा २५० मि.ग्रॅ. इतके ॲकोनाईट खाल्ल्यास सुमारे सहा तासात मृत्यू होतो. वन्य प्राण्यांना मारण्यासाठी बाणाला लावायच्या विषात याचा उपयोग केला जातो. तसेच खून करण्यासाठी गुन्हेगार याचा वापर करतात. स्वस्त व सहजगत्या उपलब्ध असल्याने विषप्रयोगासाठी याचा जास्त वापर केला जातो.

पोटात गेलेले विष टॅनिक ॲसिडचे द्रावण प्यायला देऊन वा पोटॅशियम परमँगनेटचे द्रावण प्यायला देऊन पोटाच्या बाहेर काढतात. हृदय व श्वसनसंस्था यांचे कार्य सुरळीत चालावे, यासाठी उपचार करावे लागतात. कृत्रिम श्वसन यंत्र व प्राणवायूचा पुरवठा यांचाही उपयोग करतात. असे आहे हे 'मीठा जहर'; चवीला गोड, पण भयंकर.

### सोन्याची कुऱ्हाड

एका गावातील एक लाकूडतोड्या लाकडे तोडण्यासाठी रानात गेला. नदीकाठी असलेले एक झाड पाहून तो ते झाड तोडू लागला. परंतु काही वेळातच अचानक हातातील कुऱ्हाड निसटून ती नदीच्या पाण्यात पडली. तेव्हा दुःखाने तो रडू लागला.

लाकूडतोड्याचे रडणे देवाने ऐकले. देव तिथे आला आणि त्याला म्हणाला, ''असा का रडतोस बाबा? कसले संकट कोसळले तुझ्यावर?'' तेव्हा लाकूडतोड्याने आपली कुऱ्हाड नदीत पडल्याचे सांगितले. तेव्हा देव म्हणाला,

''रडू नकोस, मी तुझी कुऱ्हाड काढून देतो.'' असे म्हणून देवाने नदीत बुडी मारली आणि एक सोन्याची कुऱ्हाड घेऊन वर येऊन त्याला दाखवीत म्हटले,

''अरे, हीच ना तुझी सोन्याची कुऱ्हाड?'' त्यावर 'नाही नाही' असे लाकूडतोड्या म्हणताच देवाने पुन्हा नदीत उडी मारून रुप्याची कुऱ्हाड वर काढून दाखवीत म्हणाले,

''मग हीच का?'' त्यावर ''हीही नाही'' असे म्हणताच देवाने पुन्हा नदीत बुडी मारून त्याची स्वतःची पाण्यात पडलेली कुऱ्हाड वर आणून त्याला दाखविताच,

''हो, हीच माझी कुऱ्हाड!' असे म्हणत त्याने आनंद व्यक्त केला आणि देवाला धन्यवाद दिले. त्याच्या वागण्यातील प्रामाणिकपणा पाहून देवाने संतुष्ट होऊन त्या सोन्या-रुप्याच्या दोन्ही कुऱ्हाडी त्याला बक्षीस दिल्या.

ही कथा लाकूडतोड्याच्या शेजाऱ्याला समजताच त्याला लोभ सुटला आणि आपणही असेल करावे म्हणून तोही नदीकाठी आला आणि मुद्दामच आपली कुऱ्हाड पाण्यात टाकून नदीकाठी मोठमोठ्याने रडू लागला.

त्याचे रडणे ऐकून देव तेथे आला आणि पहिल्याप्रमाणेच पाण्यात उडी मारून एक सोन्याची कुऱ्हाड घेऊन वर आला आणि त्या माणसाला म्हणाला,

''हीच का तुझी कुऱ्हाड?'' सोन्याची कुऱ्हाड पाहून त्या लोभी माणसाला मोह आवरला नाही. ''ती माझीच कुऱ्हाड!'' असे म्हणत तो देवाच्या हातातील कुऱ्हाड घेण्यासाठी पुढे येताच देवाने त्याच्या लबाडपणाबद्दल त्याची चांगलीच खरडपट्टी काढीत निर्भत्सना केली. सोन्याची कुऱ्हाड परत पाण्यात टाकून देवाची स्वारी अदृश्य झाली. अशा प्रकारे सोन्याची कुऱ्हाड तर दूरच; पण तो लोभी माणूस स्वतःची कुऱ्हाड देखील गमावून बसला.

**तात्पर्य** : प्रामाणिक आणि साधे वर्तन सर्वांनाच आवडते. असा माणूस सर्वांनाच आवडतो. परंतु प्रामाणिकपणाचा नुसता देखावा करून जो लबाडी करायला धजावतो, त्याची लबाडी शेवटी उघडकीला येऊन फजितीच होते.

# जीवन का अमृत (भाग १)



वही हमें सहारा देकर इस दलदल से निकाल सकता है; जिस ८४ लाख जियाजून में हमारी आत्मा सदियों से भटक रही है, उससे छुटकारा दिला सकता है। जिस रास्ते की स्वामी जी महाराज बात कर रहे हैं, वह शब्द से जुड़ने का है। बहुत से महापुरुषों ने इस रास्ते के बारे में हमें समझाया है। संत दर्शनसिंह जी महाराज ने एक शेर में फ़रमाया है :

**गुरु मिले तो मुहब्बत के राज़ खुलते हैं**
**निजात मिलती है सारे गुनाह धुलते हैं**

हमारी आत्मा एक योनि से दूसरी, दूसरी से तीसरी योनि में भटक रही है। उस पर कर्मों के धब्बे पड़े हुए हैं, गुनाहों के धब्बे हैं, हर एक विचार, हर एक बोल, हर एक कार्य का हमें भुगतान करना है।

### गुरू और परमात्मा

जब हम गुरु की शरण में आते हैं, तो सारे गुनाह धुल जाते हैं क्योंकि वे हमें इन गुनाहों को साफ़ करने का तरीका बता देते हैं। नामदान के दिन वे हमारे संचित कर्मों को अपने ऊपर ले लेते हैं, उनका नाश हो जाता है। प्रभु को पाने का रास्ता दिमाग का नहीं है, यह प्यार का रास्ता है, मुहब्बत का रास्ता है। ऐसे महापुरुष हमें प्यार करना सिखा देते हैं। संत दर्शनसिंह जी महाराज ने एक शेर में फ़रमाया है :

गुरु के दामने-रहमत से मुत्तसिल हो जा।
खिरद को छोड़ दे ऐ इश्क और दिल हो जा ।। ऐ इंसान!

तू इश्क से भरपूर है, प्यार से भरपूर है, तू शरीर नहीं, मन नहीं लेकिन शरीर में बसती हुई आत्मा है, रूह है, जो परमात्मा की अंश है। परमात्मा प्यार का महासागर है, चेतना का महासागर है, सचाई का महासागर है। हमारी आत्मा उसकी अंश होने के नाते प्यार से भरपूर है। संत दर्शनसिंह जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि हम गुरु की रहमत का दामन पकड़ लें और बुद्धि के अहंकार को छोड़ दें और प्यार का रास्ता अपनायें। हमें प्रभु से प्यार करना है। प्रभु से प्यार कैसे किया जा सकता है ? जब हम उसकी संतान से प्यार करें। प्रभु की संतान कौन है ? हर जीव जो इस दुनिया में रहता है, चाहे वह इंसानी रूप में हो, जानवर के रूप में हो या किसी और रूप में हो।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

२. बीज बुवाई करते समय और जब भी पानी देते हैं तब ऐसे दो-तीन बार २०० ली. जीवामृत एक एकड जमीन में जमीन गीली हो तब पानी के साथ या ड्रिप द्वारा देना आवश्यक है ।

३. बीज बुवाई के बाद जमीन गीली हो तब एक एकड जमीन में एक टन केंचुवे की खाद मिलाएं ।

**मिक्स फसल** - १. चने की फसल के चारों ओर एक या दो लाइन मकई की लगायें। ६ लाइन चना, ३ लाइन करडई, और एक लाइन धनियां ऐसे मिक्स फसल लेना आवश्यक हैं।

२. मकई से मित्र कीट बढ़ती है। धनिया के ऊपर ट्रायकोग्रामा बढ़ता है, जिससे कीट नियंत्रण होता है और मधुमक्खियों की संख्या बढ़ती है तो परागीकरण उत्तम होता है। करडई से पंछी ज्यादा आते हैं और इल्लियों का नियंत्रण होता है।

### आज्ञा चक्र

**बीज संस्कार**

२० किलो बीज को बीजामृत से भिगो दें और ऊपर से पहले ट्रायकोडर्मा फफूंदी रोधक १०० ग्राम, फिर रायझोबियम और पी.एस.बी. जीवाणु संवर्धक प्रति २५० ग्राम का लेप चढ़ाकर बीज को छांव में सूखने दें। आठ-दस घंटे के अंदर जमीन गीली हो तब बीज बुवाई करें।

**फसल संरक्षण**

१. एक एकड़ फसल में १२-१५ लकड़ियों का एंटीना (T साइज का) बनाकर लगाइये, जिस पर पंछी बैठने से कीट का नियंत्रण होता है।

२. इल्लियों के नियंत्रण के लिए पहले हफ्ते में ४% गोमूत्र, दूसरे हफ्ते में ५% नीम अर्क तीसरे हफ्ते में दशपर्णी अर्क फिर ४% गोमूत्र ऐसे स्प्रे करें।

**९) गेहूँ की फसल :** जमीन को शक्तिशाली बनाने के लिए (इसके लिए ज्वारी जमीन को शक्तिशाली बनाने का ही फार्मुला प्रयोग करें।) मिक्स फसल गेहूँ में राई और राजमाँ या घेवड़ा २% से ३% मिक्स करना आवश्यक है। वीज संस्कार २० किलो बीज को बीजामृत से भिगो दें और ऊपर झोटोबॅक्टर जीवाणु संवर्धक २५० ग्राम और पी.एस.बी. जीवाणु संवर्धक २५० ग्राम का लेप चढ़ायें। बीज को छांव में सूखने दें। आठ-दस घंटे के अंदर जमीन गीली हो तब बीज बुवाई करें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षिका - जो माझ्या प्रश्नाचे लवकर उत्तर देईल त्याला आज माझ्याकडून सुट्टी मिळेल..!

गण्याने लगेच आपली बॅग वर्गाबाहेर फेकली

शिक्षिका - ती बॅग कोणी फेकली? गण्या - मी, आता घरी जाऊ का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✽ आयपीएलच्या स्पॉन्सर्स ग्रुपमध्ये विवोची जागा कोणी घेतली?

- यश ग्रुप

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

तांबी काढल्यानंतर रक्तस्त्राव थांबतो. संतती प्रतिबंधासाठी Medroxy Progesteron cetate या हार्मोन्सपासून बनवलेले इंजेक्शन वापरले तर काही स्त्रियांना अति रक्तस्राव होतो. या इंजेक्शनमुळे बीजनिर्मिती होत नाही. त्यामुळे अनियमित, काही दिवसांच्या अंतराने अति रक्तस्राव होतो. इंजेक्शन बंद केल्यानंतर रक्तस्राव नियमित सुरू होतो.

**ड) अंत:स्रावी ग्रंथींचे विकार :**

पिट्युटरी ग्रंथी, थायरॉईड ग्रंथी यांच्या अंत:स्रावांमध्ये असंतुलन झाल्यास बऱ्याच वेळेला अति रक्तस्राव होतो. रक्त तपासणीमधून निदान करून योग्य उपचार केल्यास रक्तस्राव कमी होतो.

**इ) गर्भाशय -**

**कार्य विकृतीमुळे होणारा रक्तस्राव :** वरील कारणांपैकी कुठलेही शारीरिक किंवा मानसिक दोष तपासणीमध्ये दिसत नाहीत. तरीदेखील अति रक्तस्राव होत असेल, तर त्याला गर्भाशय कार्य विकृतीमुळे होणारा रक्तस्राव (Disfunctional Uterine Bleeding) असे म्हणतात. यामध्ये अति रक्तस्रावाचे निदान लवकर होत नाही. सहसा किशोरावस्थेतील मुली व रजोनिवृत्ती होणाऱ्या स्त्रिया यांमध्ये अति रक्तस्राव होतो. या दोन्ही वयोगटांमध्ये अत्यार्तव असल्यास गर्भाशयाच्या आतील अस्तर खरवडून (क्यूरेटिंग) तपासणीस पाठवावे लागते. या तपासणीमधून शरीरातील इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेरॉन यांचे प्रमाण समजते. क्युरेटीन केल्यानंतर आतील अस्तर तपासणीस पाठवून गर्भाशयाचा कॅन्सर, क्षयरोग, जंतुसंसर्ग आहे किंवा नाही याचेही निदान होते. या तपासणीतून कोणत्याच कारणांचे निदान झाले नाही तरी अशा वेळी फक्त क्यूरेटिंग केल्यामुळे देखील अति रक्तस्राव थांबतो. अत्यार्तवाचे निदान होण्यासाठी सोनोग्राफी, रक्त तपासणी, लॅपरोस्कोपी, हिस्टेरोस्कोपी यांसारख्या तपासण्या करण्याची गरज पडते. सोनोग्राफीमधून गर्भाशयाचा आकार, त्यामधील विकृत गाठी, गर्भनलिका, बीजकोष, बीजकोषांतील विकृत गाठी, गर्भाशयाच्या तोंडाला असणारी जखम या सर्व गोष्टींचे निदान होते.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**लॅपरोस्कोपी :**

तपासण्यांवरून निदान होत नसेल, तर पोटावर छोटासा छेद घेऊन लॅपरोस्कोपी करतात. यामध्ये उदर पोकळीत दुर्बीण टाकून गर्भाशय, गर्भनलिका, बीजकोष या अवयवांना प्रत्यक्ष बघून निदान करणे सोपे जाते.

**हिस्टेरोस्कोपी :** यात योनिमार्गातून गर्भाशयमुखाच्या आत दुर्बीण टाकली जाते. गर्भाशयाच्या आतील सर्व परिस्थिती या तपासणीतून समजते. विशेषत: गर्भाशयाच्या आतील अस्तराची स्थिती समजते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

## सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर, ठेवीदार, सभासद, खातेदार यांच्या विश्वासामुळे संसथेची प्रगती : चेअरमन किसनलाल बंग

नगर – रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर ही पहिलीच वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. डोंगरे महाराज यांच्या आशीर्वादाने व स्वर्गीय काकासाहेब धूत यांच्या प्रेरणेने व सर्वांच्या सहकार्याने स्थापन झालेल्या संस्थेची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. संस्थेचा आर्थिक लेखाजोखा आपणा सर्वांसमोर मांडताना मनस्वी आनंद होत आहे. संस्थेचा सर्व कारभार स्वभांडवलावर अत्यंत चोखपणे व पारदर्शीपणे चालू आहे. संस्थेच्या ठेवींचा योग्यरीतीने विनियोग करून संस्थेने समाजातील सर्व स्तरातील गरजूंना मदत करून त्यांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावला आहे. संस्थेने कोणत्याही बँकेंकडून वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतलेले नाही, मात्र संस्थेने इतर बँकेत ठेवलेल्या संस्थेच्या ठेवींवर तात्पुरता ओव्हरड्राफ्ट गरजेपुरता घेऊन तो वेळोवेळी परतही केला आहे. ठेवींमध्ये गतवर्षीपेक्षा वाढ होऊन अहवाल साली ८३ कोटी ६२ लाख रुपये इतक्या रकमेच्या ठेवी आहेत. संस्थेचा रिझर्व व इतर फंड ३४ कोटी ८० लाख रुपये इतका आहे. संस्थेची इतर बँकांमध्ये ८१ कोटी ३ लाख रुपये रकमेची सुरक्षित गुंतवणूक आहे. तसेच सर्वांच्या सहकार्याने संस्थेला यावर्षी ४ कोटी १४ लाख रुपये इतका विक्रमी नफा झालेला आहे.आपणा सर्वांचे संस्थेवर असलेल्या विश्वासाचे हे प्रतीक आहे. नेहमीप्रमाणे याही वर्षी संस्थेने १५% लाभांश जाहीर केला आहे. संस्थेस ऑडिट अ वर्ग मिळालेला आहे. एनपीए शून्य टक्के आहे. रामकृष्ण क्रेडिट अर्बन चे सभासद खातेदार, ठेविदार व हितचिंतक आणि सर्व तत्कालीन व विद्यमान संचालक यांनी दाखविलेल्या विश्वासामुळे संस्था प्रगतीपथावर आहे. संस्थेच्या सावेडी शाखेला ११ वर्षे पूर्ण झाली आहेत.सावेडी परिसरातील सर्व सभासद, खातेदार व हितचिंतक यांनी दिलेल्या उत्तम प्रतिसादामुळे सावेडी शाखेचा नफा अकरा लाख ५५ हजार रू इतका आहे. तसेच आपल्या संस्थेची मोबाईल बँकिंग सेवा उपलब्ध आहे. त्याचा सभासदांनी लाभ घ्यावा. संस्थेचे संचालक व संस्थेच्या सेवक वर्ग ही संस्थेच्या आर्थिक प्रगतीची रथाची दोन चाके आहेत.संचालक व सेवक वर्ग निस्वार्थी असल्यामुळे संस्थेच्या प्रगतीत मोठा हातभार लागला आहे.तसेच सभासदांचे सहकार्य आणि आत्मीयतेचा फार मोठा वाटा संस्थेच्या प्रगतीत आहे, असे प्रतिपादन रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी चे चेअरमन किसनलाल बंग यांनी केले आहे.



रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या प्रसंगी उपस्थित संचालक मंडळ व सभासद उपस्थित होते.

रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बडीसाजन मंगल कार्यालय येथे किसनलाल बंग यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. याप्रसंगी सहकार कायद्याप्रमाणे सहकारी प्रशिक्षण संघाचे अधिकारी एस.एल.साखरे यांनी सभासदांचे प्रशिक्षण घेतले. यावेळी संस्थापक श्रीगोपाल धूत, व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू, संचालक ॲड. राजेंद्र गुजराथी, प्रदीप पंजाबी, सुधीर झालानी, प्रकाश गांधी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, गोपाल मणियार, विश्वनाथ कासट, मधुसूदन सारडा, ॲड. अशोक बंग, अनुराग धूत, सौ.राजकमल मिनियार, सौ.शोभा राठी, अनुराधा झगडे, देवराव साठे, साईनाथ कावट, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, अधिकारी कुमार आपटे आदींसह सभासद, ठेवीदार उपस्थित होते.

सहकारी प्रशिक्षण अधिकारी म्हणाले एस एल साखरे म्हणाले, सभासद हे संस्थेचे मालक असतात. सभासदांनी क्रियाशील होऊन संस्थेच्या कार्यात सहभाग वाढवला पाहिजे. यासाठी सहकार कायदानुसार प्रशिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

सोसायटीचे सभासद उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, गेली ४० वर्ष भक्कम पायावर उभी असलेली रामकृष्ण सोसायटी ही एकमेव संस्था आहे. सध्याच्या काळात अनेक सुरू झालेल्या पतसंस्था बंद पडल्या किंवा अडचणीत आल्या. या पार्श्वभूमीवर रामकृष्णची प्रगती व विश्वासाहर्ता कौतुकास्पद आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेत आर.डी.मंत्री, सुरेश सिकची, कायदेशीर सल्लागार ॲड. शरद पल्लोड, लक्ष्मीनारायण लढे, अनिल झंवर यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना चेअरमन किसनलाल बंग यांनी समर्पक उत्तरे देत संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे निदर्शनास आणून दिले. या उत्तराबद्दल सर्व उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त करीत सोसायटीचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी व एकूणच चांगल्या कारभारावर विश्वास व्यक्त केला. प्रारंभी व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक यांनी अहवाल वाचन केले. व विषय पत्रिकेवरील विषयांची माहिती दिली. लेखापरीक्षक मे.एन.जे.लोहे ॲण्ड कंपनीचे सीए तुषार लोहे, सीए पुनीत व्होरा, सनदी लेखापाल मे.संजय डी नावंदर कंपनीचे सीए संजय नावंदर यांनी लेखा परीक्षण केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डोंगरे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन उद्योगपती नरेंद्र फिरोदीया, प्रशांत जाजू, संजय गांधी, पाली माकर, राजेंद्र थोकरीया, सौ. रंजना सोनी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.मीरा मुळे यांनी केले. तर व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू यांनी आभार मानले. सभेच्या शेवटी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.



प्रा. सय्यद मुदस्सर नजीर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना डॉ. रजनीश बार्नबस व विशाल बार्नबस आदी.

# आय. एम. एस. चे प्रा. सय्यद मुदस्सर यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठाची पीएच.डी. पदवी

नगर – भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटी संचालित आय एम एस सीडीआर व्यवस्थापन संस्थेतील प्रा. सय्यद मुदस्सर नजीर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी न नालिटीकल स्टडी ऑन सक्सेशन प्लॅनींग इन फॅमिली ओन्ड एन्टरप्रायज़ेस इन अहमदनगर डिस्ट्रिक्ट या विषयावर संशोधनप्रबंध सादर केला.

प्रा. सय्यद मागील १५ वर्षांपासून आय एम एस सीडीआरमध्ये अध्यापन करत असून, त्यांचे संशोधन मार्गदर्शन व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे यांनी केले. संशोधनप्रक्रियेत आय एम एसचे संचालक डॉ. एम. बी. मेहता व उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

या यशाबद्दल बी.पी.एच.ई. सोसायटीचे चेअरमन डॉ. रजनीश बार्नबस व सेक्रेटरी विशाल बार्नबस यांनी प्रा. सय्यद यांचे कौतुक केले आहे.

# भिंगार अर्बन बँकेची ११७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

## सभासदांना १५% लाभांश जाहीर, सभासदांच्या विश्वासामुळे बँक प्रगतीपथावर : चेअरमन अनिलराव झोडगे

नगर – सभासदांच्या विश्वासामुळे भिंगार अर्बन बँक प्रगतीपथावर वाटचाल करत आहे. बँकेच्या माध्यमातून आजपर्यंत घेण्यात आलेल्या प्रत्येक निर्णयात सभासदांचे व खातेदार आणि ठेवीदार यांच्या हिताचे निर्णय घेतल्यामुळे प्रत्येक व्यक्ती बँकेवर विश्वास ठेवत आहे, आणि त्या विश्वासाला आम्ही संचालक मंडळ कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही भिंगार अर्बन बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे यांनी दिली आहे.



भिंगार अर्बन को–ऑप बँक लि.ची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीचे वातावरणात पार पडली.

भिंगार अर्बन को–ऑप बँक लि.ची ११७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भाग्यलक्ष्मी सांस्कृतिक भवन, भिंगार येथे खेळीमेळीचे वातावरणात पार पडली. यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, संचालक राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णु फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, तिलोत्तमाबाई करांडे, अनिता भुजबळ, रामसुख मंत्री, राजेन्द्रबोरा, व्यवस्थापक शशिकांत महाजन व सभासद उपस्थित होते.

पुढे बोलताना बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे यांनी सभासदांचे स्वागत करतांना बँकेची आर्थिक स्थिती विषद करतांना सांगितले की, अल्पावधीमध्ये बँकेने मोठी प्रगती केली आहे. मार्च २०२५ अखेर बँकेला ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे. कर्जामध्ये वाढ झाली असून, वसुलीचे कामही सक्षमपणे होत आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. खातेदारांचा व सभासदांचा बँकेवर असलेल्या दृढ विश्वासामुळेच ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. तसेच युपीआय क्युआर कोड व मोबाईल बँकिंग सेवाही ही सर्व शाखांमध्ये सुरु आहे

किसनराव चौधरी म्हणाले की, भविष्यात बँकेच्या ठेवी. वाढविणेचे उददीष्ट बँकेने ठेवले आहे. बँकेच्या आठ शाखा सध्या चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. सर्व शाखांमध्ये २४ तास ए.टी.एम. सुविधा कॅश डिपॉझिटसह, आर.टी. जी.एस./एन.ई.एफ.टी., लॉकर्स सुविधा बाहेरगावचे डी.डी. सुविधा दिल्या जात आहेत. सर्व शाखा ऑनलाईनने जोडल्या आहेत. तसेंच, बँके मार्फत नजिकच्या काळात मोबाईल बँकिंग सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे. तत्पर सेवक वर्ग व माझे सर्व संचालक मंडळ सचोटिने कामकाज करित आहेत.

यावेळी बँकेचे व्यवस्थापक शशीकांत महाजन यांनी सभेच्या नोटीसचे वाचन करुन, नोटीसीतील विषयांना सभासदांची मंजूरी घेतली. तसेच बँकेच्या वेगवेगळ्या योजनांचा फायदा करून घेण्याचे आवाहन केले.

व्हा चेअरमन किसनराव चोधरी यांनी आभार मानले.

तसेच सहकार प्रशिक्षण केंदाचे वतीने सुनील साखरे यांनी मार्गदर्शन केले. सभासद यांचे गुणवंत पाल्य यांचा विविध क्षेत्रातील कामगिरीबद्दल यावेळी सन्मान करण्यात आला.

# टेक्नोस्पोर्ट्‌र्स कंपनीकडून महाराष्ट्रासाठी नगरच्या गांधी क्रिएशनची सुपर स्टॉकिस्ट म्हणून निवड

नगर – फॅशन व गुणवत्तेसाठी नावाजल्या जाणाऱ्या स्पोर्ट्स वेअर साठी प्रसिद्ध असलेल्या टेक्नोस्पोर्ट्स कंपनीने नगरमधील गांधी क्रिएशनची महाराष्ट्रासाठी सुपर स्टॉकिस्ट म्हणून निवड केली आहे. गांधी क्रिएशन मागील ८ वर्षापासून टेक्नोस्पार्टसची विक्री करीत असून आता पुणे, नाशिक, बीड, लातूर बारामती, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर या महाराष्ट्रातील जिल्ह्यात वितरण करण्यात येणार आहे. गांधी क्रिएशन उच्च गुणवत्ता, व्यावहारिक सचोटी, विश्वासासाठी नावजले जाते. ग्राहकांशी आपुलकीचा, थेट कस्टमर शी असलेलं नातं असल्याने गांधी क्रिएशनने बाजारपेठेत वेगळा ठसा उमटविला आहे. त्याचीच दखल घेत टेक्नोस्पोर्ट्स गांधी क्रिएशनवर सुपर स्टॉकिस्ट म्हणून जबाबदारी सोपवली आहे, अशी माहिती कंपनीचे सहसंस्थापक व संचालक सुमित संथालिया यांनी दिली.



निखील गांधी

या निणर्यामुळे टेक्नोस्पोर्टच्या उत्पादनांची उपलब्धता वाढण्यास मदत होईल. वितरण कमी वेळेत होईल शहर तसेच ग्रामीण भागात ब्रॅण्डची पोहोच वाढण्यास मदत होणार आहे. २०२५ अखेरीस ५० ब्रॅण्ड स्टोअर्स खुले करण्याचे कंपनीचे ध्येय आहे. हा एक भारतीय थलीजर ब्रँड आहे जो उच्च दर्जाचे, परवडणारे स्पोर्ट्सवेअर देतो. संथालिया यांनी २०१५ मध्ये सुनील झुनझुनवाला यांच्यासोबत कंपनीची सह–स्थापना केली. ज्याचे उद्दिष्ट आंतरराष्ट्रीय ब्रँडच्या उच्च किमतींशिवाय तांत्रिकदृष्ट्या प्रगत, मेड–इन–इंडिया ॲक्टिव्ह वेअरसाठी बाजारपेठ निर्माण करणे होते. त्यांनी ब्रँडच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. घरातील फॅब्रिक क्षमता विकसित करण्यावर, नावीन्यपूर्णता आणि शाश्वततेला प्राधान्य देण्यावर आणि भारतीय बाजारपेठेत टेक्नोस्पोर्टची उपस्थिती वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. अशावेळी गांधी क्रिएशनसारखा नावाजलेला स्थानिक स्टॉकिस्ट मिळणे कंपनीसाठी महत्वाची गोष्ट आहे.

टेक्नोस्पार्टने गांधी क्रिएशनसोबची व्यापारी मैत्री आम्हाला महाराष्ट्रात प्रभाव वाढविण्यासाठी महत्वाची ठरेल असा विश्वास व्यक्त केला. गांधी क्रिएशननेहीपश्चितमहाराष्ट्रातीलग्रामीणवनिमशहरीभागांमध्येटेक्नोस्पोर्टची दर्जेदार उत्पादने पोहचवण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

निखिल गांधी यांनी सांगितले की, गांधी क्रिऐशन २०११ पासून नगरमध्ये रिटेलर व्यावसायिकांची गरज ओळखून त्यांना योग्य दरात गारमेंट उपलब्ध करून व्यावसायिकतेला बळकटी देण्याचे काम करीत आहे. व्यावहारिक सचोटी, उच्च गुणवत्ता, विश्वास या बळावर त्यांनी वाटचाल केली आहे. रिटेल व्यावसायिकांना देशभरातील प्रमुख व नामांकित उत्पादकांकडील गारमेंटस ते उपलब्ध करून देतात. चिल्ड्रेन वेअर, मेन्स वेअर, लेडीज वेअर, सिझनेबल वेअर्सची होलसेल विक्री केली जाते. यात देशातील अनेक नामांकित ब्रॅण्डस आहेत. गांधी क्रिएशनमार्फत सर्व प्रकारचे रेडिमेड गारमेंट, स्पोर्ट्स वेअर, सिझनल वेअर, हॅण्डलूम, युनिफॉर्म, इत्यादीची होलसेल विक्री होते. ते झील, जॉकी सारख्या इंटरनॅशनल ब्रॅण्डचेही अधिकृत वितरक आहेत. १५ वर्षांचा प्रवास – विश्वास, सत्य, पारदर्शकता आणि योग्य निवडीचा! गांधी क्रिएशन – मूल्याधारित यशाची वाटचाल! तब्बल १५ वर्षांच्या वाटचालीत गांधी क्रिएशनने उच्च गुणवत्ता, यावहारिक सचोटी, आणि विश्वास कायम जपला आहे. त्यामुळेच टेक्नोस्पोर्टस या नामांकित कंपनीने सुपर स्टॉकिस्टचा बहुमान दिला आहे, या याचा लाभ घेण्यासाठी रिटेल व्यावसायिकांनी माहितीसाठी ९६०७३५२४२४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन गांधी क्रिएशनचे निखिल गांधी यांनी केले आहे.

# बडीसाजन ओसवाल युवक संघाची कार्यकारिणी जाहीर, अध्यक्षपदी धीरज लोढा, सेक्रेटरीपदी डॉ. कुणाल कोठारी

नगर – श्री बडीसाजन ओसवाल युवक संघाची सन २०२५ ते २०२६ साठीची नूतन कार्यकारिणी जाहीर झाली. यात युवक अध्यक्षपदी धीरज लोढा, उपाध्यक्षपदी मनोजकुमार चोपडा तर सेक्रेटरीपदी डॉ.कुणाल कोठारी व खजिनदारपदी रोहित चुत्तर यांची निवड करण्यात आली आहे. विभागीय संपर्क प्रमुखपदी विकास सुराणा यांची सर्वानुमते निवड झाली आहे.



युवक संघाच्या विभागप्रमुखपदी अक्षय पारख (सावेडी), अरिहंत ओस्तवाल (शहर), आनंद मंडलेचा (केडगाव), ओम छाजेड (सारसनगर/माणिकनगर), अभिषेक बोरा (स्टेशन रोड), गौरव धोका (शहर), सुत राठौड़ (भिंगार) यांची निवड करण्यात आली.

अध्यक्ष धीरज लोढा म्हणाले, युवक संघ गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात योगदान देत आहे. अशा संस्थेच्या अध्यक्षपदाची संधी मिळणे आनंददायी आहे. दरवर्षी युवक संघार्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. युवा वर्गाला एकत्र आणून विधायक कामे केली जातात. त्यांच्यात नवचेतना निर्माण केली जाते. नूतन कार्यकारणीला सोबत घेवन भविष्यातही युवक संघ विविध उपक्रम राबवेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) अहिल्यानगर शाखेच्या वतीने नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांना सामाजिक कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# सामाजिक कार्य गौरव पुरस्काराने नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांचा सन्मान

नगर – महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) अहिल्यानगर शाखेच्या वतीने नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांना सामाजिक कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकतेच महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) अहिल्यानगर शाखेचे युवा साहित्य संमेलन शहरात पार पडले. यामध्ये बोरुडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, कोषाध्यक्ष सुनिता राजे स्वागताध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे व संमेलन अध्यक्षा अभिनेत्री तथा लेखिका गौरी देशपांडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे, जयंत वाघ, कार्यक्रमाचे संयोजक जयंत येलुलकर, प्राचार्य बाळासाहेब सागडे आदी उपस्थित होते.



# आदर्शवत जीवनशैलीसाठी काही गोष्टींचा त्याग करणे आवश्यक

## साध्वी महासती दिव्यदर्शन महाराज यांचा उपदेश, केडगावच्या जैन स्थानकात ३१ दिवसांच्या उपवासांची सांगता

नगर – सध्या सर्वच जण मोठ्या प्रमाणात आपला वेळ वायफळ घालवत आहेत. आदर्शवत जीवनशैलीसाठी काही गोष्टींचा त्याग करणे आवश्यक आहे. आपापसात बोलताना कमी बोला, टीव्ही बघताना काही सिरीयल बघा तसेच मोबाईलचाही वापर कमी करा. या गोष्टींचा काही प्रमाणात त्याग कराच शिवाय जेवनावरही नियंत्रण ठेवा. जेवढा वेळ तुम्ही या गोष्टींसाठी देत आहात त्यात काटछाट करून वाचलेल्या वेळेत जप, तप व सेवा करा हेच परमात्माला अपेक्षित आहे, असा उपदेश साध्वी महासती दिव्यदर्शन महाराज यांनी केले.



केडगाव येथील जैन स्थानकात ३१ दिवस उपवास करणाऱ्या शितल जांगडा व वैशाली कांकरिया यांच्या ३१ उपवासांची सांगता निमित्त स्थानकाच्या वतीने दोघींना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी साध्वी महासती दिव्यदर्शनजी महाराज व महासती पुनीतदर्शनजी महाराज, पनालाल बोकरिया व केडगाव जैन स्थानकाचे अध्यक्ष अतुल शिंगवी यांच्यासह पदाधिकारी.

केडगाव येथील जैन श्रावक संघाच्या स्थानकात सुरू असलेल्या चातुर्मासात सौ. शितल निलेश जांगडा व सौ. वैशाली दीपक कांकरिया यांनी केलेल्या ३१ दिवसांच्या उपवासांची पचकावणी (सांगता) नुकतीच साध्वी महासती दिव्यादर्शन महाराज व महासती पुनितदर्शन महाराज यांच्या उपस्थितीत झाली. तसेच अकोळनेर येथील स्थानकातही आदर्शऋषी महाराजांनी सौ. कांकरिया व सौ.जंगडा यांना आशीर्वाद देऊन त्यांचे कौतुक केले. उपवासाच्या सांगता निमित्त केडगाव स्थानकाच्या वतीने दोन्ही महासतींना जेष्ठ नागरिक पनालाल बोकरिया व केडगाव जैन स्थानकाचे अध्यक्ष अतुल शिंगवी यांच्या हस्ते विशेष मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी स्थानकाचे सर्व पदाधिकारी, परिसरातील नागरिक, महिला व युवक उपस्थित होते.

दिव्यदर्शन महाराज यांनी आपण छोट्या छोट्या कार्यातून कसे चांगले काम व सेवा करू शकतो याचे विश्लेषण करून सेवेचे महत्त्व सांगितले. त्या म्हणाल्या, शितल जांगडा व वैशाली कांकरिया यांनी ३१ दिवस उपवास करून मोठा तप केला आहे. त्यांच्यापासून सर्व नागरिकांनी प्रेरणा घ्यावी व त्यांच्या प्रमाणे तप करावा. या साधनेमुळे जीवनामध्ये मोठ्या प्रमाणत बदल होतात व परमात्माचे आशीर्वाद लाभतात. या दोघींनीही आपल्या कुटुंबाबरोबरच केडगावची शान वाढवली आहे. केडगाव जैन स्थानकाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे काम उत्कृष्ट व प्रेरणादायी असून त्यांनी ज्या पद्धतीने या चतुर्मासाची नियोजन केले आहे ते कौतुकास्पद आहे. अतुल शिंगवी यांनी केडगाव मधील युवाशक्ती धर्म कार्याला जोडली आहे.

प्रास्ताविकात अतुल शिंगवी म्हणाले, जैन स्थानकाच्या इतिहासात आजचा दिवस आनंदही व सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. शितल जांगडा व वैशाली कांकरिया यांनी ३१ दिवस उपवास करून आदर्श निर्माण केला आहे. केडगाव जैन स्थानकाच्या विविध उपक्रमामुळे केडगावमध्ये धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यासाठी समाजातील ज्येष्ठ व्यक्ती, नागरिक, युवक व महिला सहकार्य करत सहभागी होत आहेत.

यावेळी ज्येष्ठ नागरिक गणेशमल कांकरिया, पोपटलाल शिंगवी, फुलचंद चंगेडिया, रत्नमाला चोरडिया, शशिकला गांधी, राजु धोका, राजू बडेरा, जैन स्थानकाचे उपाध्यक्ष मयुर चोरडिया, सेक्रेटरी रुपेश गुगळे, सहसेक्रेटरी विपुल कांकरिया व ललित गुगळे, खजिनदार सोहन बरमेचा, परेश बलदोटा, रोहन चंगेडिया, कुशल भंडारी, पियुष बाफना, कमलेश फिरोदिया, दर्शन गांधी, पारस शेटीया, कमलेश गुंदेचा, राहुल शिंगवी, उमेश बलदोटा, सफल जैन, सुशील फिरोदिया, निलेश जांगडा, पारस जांगडा, दिपक कांकरिया, महेश गांधी, यश भंडारी, महावीर बोरा, महेंद्र बोरा, कमलेश पोखर्णा, गणेश भंडारी, अमित मेहेर आदींसह नागरिक उपस्थित होते.

CONNPLEX CINEMAS
MONSOON TUESDAY BLOCKBUSTER
MOVIES AT ₹149/- | ₹199/-
GET READY TO EXPERIENCE ULTIMATE BIG SCREEN CELEBRATION WITH CONNPLEX CINEMAS KOHINOOR MALL, AHILYA NAGAR
FOR BOOKING VISIT CONNPLEX CINEMAS WEBSITE/APP TICKETING.THECONNPLEX.COM *EXCLUDING 3D & RECLINER, OFFER APPLICABLE IN SELECT CITIES.T&C APPLY* OFFER VALLID ON 22-09-25

# सरकारी शाळा वाचविण्यासाठी शहरात रॅली

नगर – सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अभियान या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर शहर तसेच निवडक तालुकास्तरावरून विद्यार्थी, पालक, सामाजिक संस्था व कार्यकर्ते यांच्या सहभागातून २० सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅली माळीवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व मार्केटयार्ड चौक येथील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन व पुष्पहार अर्पण करत जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी विद्यार्थी व पालकांच्या वतीने सरकारी शाळा वाचवा असे पोस्टर हातात घेऊन सरकारी शाळा वाचवा, आम्हांला मोफत शिक्षण द्या, शिक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या मालकीचं अश्या घोषणा देत हा सर्व परिसर दानाणून निघाला होता. या रॅलीतून मांडण्यात येणाऱ्या प्रमुख मागण्यांमध्ये शिक्षणातील खाजगीकरण रोखणे, लहान शाळा बंद करण्याचे धोरण थांबवणे, वाड्यावस्त्यांवरील १०–२० पटाखालील शाळा कायम ठेवणे, अंगणवाडीपासून उच्च व्यावसायिक शिक्षणापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण, खाजगी शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाने भरणे, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांचे सरकारी शाळांमध्ये सक्तीने शिक्षण घेणे बंधनकारक करावे, आमदार–खासदार निधीतून शाळा दुरुस्ती व देखभाल निधी उपलब्ध करून द्यावा, शिक्षण विभागातील सर्व रिक्त पदे तातडीने भरणे या महत्त्वाच्या मागण्यांसाठीची जनजागृती करणे हा होता. रॅलीच्या माध्यमातून शिक्षण विभागातील दर्जा घसरल्याची कारणे व वास्तव यातून शासनाला मागणीचे निवेदन देण्यात आले.


सरकारी शाळा वाचवा, आम्हांला मोफत शिक्षण द्या, शिक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या मालकीचं अश्या घोषणा देत रॅली काढण्यात आली. (छाया – जितेंद्र आढाव)

या संदर्भात शाळा वाचवा या रॅली चे मुख्य संयोजक सुदाम लगड यांनी सांगितले की, शासकीय व अशासकीय आश्रमशाळांमध्ये पायाभूत सुविधा नाहीत, शिक्षकांची कमतरता आहे, व्यवस्थापनातील त्रुटी, शैक्षणिक दर्जा खालावणे, विद्यार्थी समस्या, समाज व पालकांचा कमी सहभाग आणि यंत्रणेत समन्वयाचा अभाव या गंभीर मुद्द्यांवर शासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण सर्वांसाठी समान आणि मोफत व्हावे, हा आमचा आग्रह असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

या आंदोलनासाठी रावसाहेब क्षेत्रे, कॉम्रेड प्रवीण सोनवणे, कॉम्रेड संदिप सकट, सुनिल ढोले, विजय भारस्कर, योगेश साबळे, लक्ष्मण शिंदे, जालू शेलार, राहूल ठोकळ, रुपेश जगधने, जालिंदर निकम, कृष्णा लोहकरे, सकट, अलिशा गर्जे, लोककलावंत अनंत द्रविड, ॲड. जितेंद्र आढाव, प्रा.श्याम शिंदे, प्रा.बापू चंदनशिवे आदी मराठी शाळेमधील विद्यार्थी सहभागी झालेले होते.

दिनांक – 22 सप्टेंबर ते 25 सप्टेंबर 2025 | टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
Jolly LLB 3 09:30 AM | 12:30 PM 01:50 PM | 03:25 PM 06:20 PM | 09:15 PM 10:10 PM
The Conjuring 04:45 PM
The Bengal Files 09:00 AM
Mirai 06:55 PM
Nishaanchi 10:00 PM
Demon Slayer 11:00 AM
Dashavatar 08:00 AM | 12:45 PM 04:00 PM | 07:15 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 19 SEPT TO 25 SEPT
जॉली LLB 3 08:00 AM 09:00 AM 12:15 PM 04:45 PM 05:10 PM 06:00 PM 08:00 PM 10:45 PM
डेमॉन स्लेयर (H) 09:20 AM 08:40 PM
दशावतार 07:45 PM
बिन लग्नाची गोष्ट 02:15 PM
कुर्ला टू वेंगुर्ला (E) 03:10 PM
द कॉन्जुरिंग 11:20 PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Box Office | bookmyshow
नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

## ३ लाखाचा धनादेश न वटल्याने आरोपीस शिक्षा

नगर – आरोपी सुभाष आनंदा कांबळे यांनी फिर्यादी प्रविण शशिकांत राऊत यांच्याकडुन प्लॉट घेण्याकरीता रक्कम रु. ३,००,००० कमी पडत आहे. दिड ते दोन महिन्यात परत करण्याचे बोलीवर हातउसनवारीने रक्कम घेतली होती. परंतु आरोपीने मुदत संपल्यानंतरही फिर्यादीस रक्कम न देता चेक फिर्यादीस दिलेला होता सदरचा न वटता परत आला व फिर्यादीस चेकची रक्कम मिळाली नसल्याने फिर्यादीने आरोपी विरुध्द चेक न वटल्याबाबतची फिर्याद दिली. न्यायालयाने फिर्यादी यांनी दाखल केलेले सर्व पुरावे फिर्यादी यांचे वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरुन अति. मुख्य न्याय दंडाधिकारी, कोर्ट नं. १५ (आर. डी. गवई) यांनी आरोपीस १९/९/२०२५ रोजी दोषी धरुन आरोपीस ६ महिने कारावासाची शिक्षा व ३,५०,००० रू. दंड व दंड न भरल्यास एक महिन्याची साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. फर्यादीतर्फे ॲड. विशाल बबनराव पठारे, ॲड. मयुरी पठारे, ॲड. शितल दुसुंगे–होळकर, ॲड. माधुरी वाघमारे, ॲड. ऐश्वर्या काळे यांनी कामकाज पाहिले.

# महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे

### संगीताताई भोसले यांचे प्रतिपादन

नगर – आधुनिक जीवनशैलीत महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तनाचा कर्करोग अशा आजारांचे लवकर निदान होणे अत्यंत आवश्यक असून, अशा शिबिरांमुळे महिलांना योग्य वेळी उपचार मिळाल्यास भविष्यातील धोके टाळता येऊ शकणार असल्याचे माजी नगरसेविका संगीताताई गणेश भोसले म्हणाल्या

जायंटस् वेल्फेअर फाऊंडेशनच्या ७२ व्या वर्धापन दिनानिमित्त स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत महिलांसाठी आणि किशोरवयीन मुलींसाठी विशेष आरोग्य तपासणी व सर्वरोग निदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात गरोदर माता, बाळंतीण महिला तसेच किशोरवयीन मुलींना आरोग्य तपासणी करुन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

शहरातील जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन संगीताताई भोसले, मीनाताई संजय चोपडा व जायंटस् वेल्फेअर फाऊंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी महापालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख, जायंटस् ग्रुपचे अभय मुथा, अमित धोका, नूतन गुगळे, आयटीआय संस्थेच्या देशमुख मॅडम, सौ. पुरी आदी उपस्थित होत्या.


जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी संगीताताई भोसले, मीनाताई संजय चोपडा व संजय गुगळे आदी उपस्थित होते.

### जायंटस् ग्रुप ऑफ अहिल्यानगर शाखेचा सेवा सप्ताहाचा उपक्रम

डॉ. आयेशा शेख यांनी सांगितले की, या शिबिरांमुळे किशोरवयीन मुलींना आरोग्य व स्वच्छतेबाबत योग्य मार्गदर्शन मिळते. तसेच गरोदर व बाळंतीण मातांची तपासणी झाल्यामुळे मातामृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट केले.

जायंटस् ग्रुपतर्फे डिजिटल ब्लड प्रेशर मॉनिटर हे उपकरण जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देण्यात आले. व्यसनमुक्तीच्या जनजागृतीसाठी तंबाखू व सिगारेटच्या दुष्परिणामांवर आधारित पोस्टरचे यावेळी विमोचन करण्यात आले. या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांची तपासणी करून उपचार केले. यात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. जयश्री रोराळे, बालरोगतज्ज्ञ डॉ. आशिष इंगळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख, डॉ. कटारिया, आहारतज्ज्ञ नम्रता मकासरे, दंततज्ज्ञ डॉ. विश्वजित देशमुख, नेत्रतज्ज्ञ डॉ. राजेंद्र गायकवाड, डॉ. कमल गायकवाड, योगतज्ज्ञ डॉ. सुरेखा खोसे, मेघांजली मध्येतू, एक्स रे टेक्निशीयन अच्युत घुमरे, क्षयरोग विभागाचे अमोल पागिरे, शीतल नरवडे तसेच इतर वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग स्टाफ सहभागी झाले होते.

जायंटस् ग्रुप गेल्या ४० वर्षांपासून विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवीत आहे. सेवा सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, जनावरांची मोफत तपासणी, वृक्षारोपण, अंमली पदार्थविरोधी जनजागृती, स्तनाचा कर्करोग जनजागृती तसेच मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा यांसारखे उपक्रम घेण्यात आले असल्याची माहिती संजय गुगळे यांनी दिली.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली मिळकत **१. शेख शकील महंमद, २. सबिहा जावेद शेख, ३.अर्शिया असिफ इकबाल हजारी, ४. अकिब जावेद शेख, सर्व रा. बॉम्बे बेकरी जवळ, मुकुंदनगर, अहमदनगर** यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **(सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन:**– जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार** येथील **मुकुंदनगर भागातील** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे– सर्व्हे नंबर ३२१/१ मधील प्लॉट नं. १८ चे क्षेत्र २१६.०० चौ.मीटर हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील तळमजल्यावरील बांधकाम क्षेत्र ५३.८७ चौ.मीटर व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४९.७२ चौ.मीटर असे एकुण बांधकाम क्षेत्र १०३.५९ चौ.मीटर असून ही संपूर्ण मिळकत. **यांसी चतुःसिमा–**
**पुर्वेस :– रस्ता,** **दक्षिणेस :– प्लॉट नं. १७,**
**पश्चिमेस – फॉरेस्ट,** **उत्तरेस :–प्लॉट नं. १९,**

दि. २२/०९/२०२५.
अहमदनगर.

**ॲड.तनवीर एम शेख,**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड.मोहसीन आय.शेख**
कस्तुरी प्लाझा, डावरेगल्ली, अहमदनगर,
मो : ८०८७७४२४२८,९२०९५९७१५०

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

# डॉ. आंबेडकर परिनिर्वाण भूमि सन्मान-कार्यक्रम समितीच्या जिल्हाध्यक्षपदी अण्णासाहेब गायकवाड यांची नियुक्ती

नगर – डॉ. आंबेडकर परिनिर्वाण भूमि सन्मान–कार्यक्रम समितीच्या (नवी दिल्ली) अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी अण्णासाहेब गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंद्रेश गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे व पुणे जिल्हाध्यक्ष सुदाम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गायकवाड यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

डॉ. आंबेडकर परिनिर्वाण भूमि सन्मान–कार्यक्रम समितीच्या जिल्हाध्यक्षपदी अण्णासाहेब गायकवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विविध सामाजिक संघटनांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात, पिंपळगाव सोसायटीचे चेअरमन शंकरराव मुळे, शेतकरी रामदास वाघ, सर्जेराव शिरसाठ, मराठा क्रांतीचे विजय भगत, विठ्ठल भिंगारदिवे, सुभाष आल्हाट, बौद्धाचार्य निलेश जाधव, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते अनिल घाटविसावे, सलीमभाई शेख, मुन्नाभाई शेख, असीफ बेग, समीर शेख, मिलींद आंग्रे, संजय देवढे आदी उपस्थित होते.


डॉ. आंबेडकर परिनिर्वाण भूमि सन्मान–कार्यक्रम समितीच्या जिल्हाध्यक्षपदी अण्णासाहेब गायकवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विविध सामाजिक संघटनांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे व व्यवहाराची बोलणी चालु आहे. सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार करतील; मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.२२/०९/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे भिस्तबाग** येथील **सर्व्हे नं.** १२/१३ मधील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–

| | | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २ | ८०.१९ हा संपूर्ण प्लॉट | ६.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ३ | स.नं.१२/१ व १/२ व १ पै/२/३/४ व ८ व २ पैकी प्लॉट नंबर १० व ११ | प्लॉट नंबर १ |
| ३ | ८०.९९ हा संपूर्ण प्लॉट | ६.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ४ | स.नं.१२/१ व १/२ व १ पै/२/३/४ व ८ व २ पैकी प्लॉट नंबर १० व ११ | प्लॉट नंबर २ |
| ४ | ८१.८५ हा संपूर्ण प्लॉट | ६.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ५ | स.नं.१२/१ व १/२ व १ पै/२/३/४ व ८ व २ पैकी प्लॉट नंबर १० व ११ | प्लॉट नंबर ३ |

**विद्यमान मालकांचे नाव**
**श्री.पार्वती कन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार**
**१) महादेव धोंडीबा निमसे**
रा.मु.पो.मांडवे–सांडवे, ता.जि.अहिल्यानगर
अहिल्यानगर
**२) समीर गफूर पठाण**
रा.३२, रामकृष्ण कॉलनी, गुलमोहररोड, सावेडी, अहिल्यानगर.

**ॲड. आर.टी.शर्मा**
मो.नं.९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४, १७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहिल्यानगर

## LOST AND FOUND NOTICE

Notice is hereby given that an Indenture of Original Agreement to sale bearing no 1393/14 registered on 5.3.2014 with SRO Ahmednagar-1 in respect of Row House No.8 in "Shri Vaishnavi Duplex Row Residency" out of S.No. 623 situated at Wadgaon Gupta, Tal Nagar Dist. Ahmednagar has been lost/stolen in transit, If found, please
**contact Mr. Sachin Kisan Shelke.**
**Contact no- 7588031130**
Date-21/09/2025

**Adv Anand C Chanodiya**
**Imarat Company, Kapad Bazar**
**Ahmednagar**

जय मल्हार शिक्षण संस्थेचे
**जय मल्हार विद्यालय, पिंपळगांव रोठा**
ता.पारनेर, जि.अहिल्यानगर : ४१४ ३०४

## टेंडर नोटीस

**लेबर कॉन्ट्रॅक्टर व मटेरियल सप्लायर नेमणेबाबत (दरपत्रक निविदा)**

आमच्या विद्यालयाचे नवीन इमारत २ रा मजला, ४ वर्ग खोल्या, स्टोअररुम, स्वच्छतागृह, पॅसेज, जिना, पॅरापीट वॉल इत्यादी ब्लॉकचे बांधकाम व आतील प्लास्टर करणे, अनुभवी लेबर कॉन्ट्रॅक्टरकडून लाईट वेट कॉंक्रीट ब्लॉकमध्ये बांधकाम करणे यासाठी दरपत्रक निविदा मागविण्यात येत आहे. कोरे टेंडर फॉर्म शाळेच्या वरील पत्त्यावर दिनांक २३/०९/२०२५ ते दिनांक २५/०९/२०२५ पर्यंत रुपये ५००/– भरुन वेळ सकाळी ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत शाळेत मिळतील व भरलेले टेंडर फॉर्म सिलबंद लिफाफ्यात दिनांक २६/०९/२०२५ ते दिनांक २९/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत शाळेच्या वरील पत्त्यावर जमा करावेत. टेंडर जमा करताना त्यासोबत रुपये ३०००/– बयाना रक्कम भरावी लागेल. वरील काम पूर्ण करण्याचा कालावधी ३ महिने राहील.

१) बांधकामासाठी लागणारे मटेरियल वाळू, सिमेंट, केमिकल, लाईट वेट कॉंक्रीट ब्लॉक, विंडोग्रील, डोअर फ्रेम व इतर टेंडरमध्ये नमूद केलेले मटेरियल इत्यादींचे रेट बंद पाकीटामध्ये द्यावेत.

२) कोणतेही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार शिक्षण संस्थेने राखून ठेवले आहेत.

मुख्याध्यापक
**जय मल्हार विद्यालय**
पिंपळगांव रोठा, ता.पारनेर
जि.अहिल्यानगर.

सचिव
**जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्था**
पिंपळगांव रोठा, ता.पारनेर,
जि.अहिल्यानगर, मो.नं. ९८२२६२०१४२


५ ऑक्टोबर रोजी सर्व पक्षीय व संघटनांच्या वतीने होणाऱ्या मोर्चाच्या नियोजनार्थ रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.

# जामखेडमध्ये ५ ऑक्टोबर रोजी सर्वपक्षीय व संघटनांचा एल्गार मोर्चा

### साळवे कुटुंबीयांवरील हल्ल्यातील सर्व आरोपींना अटक करुन पोलीस संरक्षण देण्याची मागणी

नगर – रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या कुटुंबीयांवर जामखेड तालुक्यातील नान्नज येथे जीवघेणा हल्ला झालेला असताना सर्व आरोपींना अटक करुन साळवे कुटुंबीयांना पोलीस संरक्षण देण्याच्या मागणीसाठी जामखेड येथे ५ ऑक्टोबर रोजी सर्व पक्षीय व संघटनांच्या वतीने तहसील कार्यालयावर एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

५ ऑक्टोबर रोजी सर्व पक्षीय व संघटनांच्या वतीने होणाऱ्या मोर्चाच्या नियोजनार्थ रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी रिपाईचे राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, अशोकराव गायकवाड, जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अजय साळवे, सुमेध गायकवाड, डॉ. नन्नवरे, गणेश कदम, शिवाजी साळवे, बापू जावळे, सोनवणे, प्रा. जयंत गायकवाड, राज्य सचिव सुमेध क्षीरसागर, गायकवाड सर, संघराज गायकवाड आदी उपस्थित होते.


जामखेड तालुक्यातील नान्नज येथे २४ ऑगस्ट रात्री रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. तलवार, कोयते आणि काठ्यांनी सज्ज असलेल्या दहा–बारा गुंडांनी साळवे यांच्या कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला केला होता. या हल्ल्यात महिलांसह सर्व कुटुंबीयांना गंभीर दुखापत झालेली आहे. या हल्ल्यातील सर्व आरोपीवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत कार्यवाही करावी, पूर्वनियोजित कट करून जीवे मारण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला कलम १२० ब वाढीव कलम लावावे, सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी, साळवे कुटुंबीयांना या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत पोलीस संरक्षण देण्यात यावे, या कटातील मुख्य सूत्रधाराला तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अर्थजगत

**सिस्टॅमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन किंवा एसआयपी हा आजच्या काळातील गुंतवणुकीचा सर्वांत लोकप्रिय मार्ग आहे. यामुळे लहान गुंतवणूकदारांनाही शेअर बाजार किंवा म्युच्युअल फंडमध्ये नियमित पैसे गुंतवण्याची आणि दमदार परतावा मिळवण्याची संधी मिळते. एसआयपीमध्ये चक्रवाढ व्याजाचा फायदा मिळत असतो. यामुळे दीर्घकाळात मोठा फंड तयार होऊ शकतो. बहुतेक लोक एसआयपी लाँग टर्म म्हणजेच दीर्घकाळासाठी सुरू करतात. कारण दीर्घकाळात कंपाऊंडिंगचा फायदा जास्त मिळतो.**

## एसआयपीचे सलग तीन हप्ते चुकल्यास...



यामध्ये आपल्याला एक महत्त्वाची काळजी घ्यावी लागते. ती म्हणजे कुठल्याही महिन्यात आपला हफ्ता चुकता कामा नये. जर काही परिस्थितीत बँकेत पुरेसे पैसे नसतील आणि सतत काही हफ्ते भरले गेले नाहीत तर त्याचा एसआयपीवर आणि गुंतवणुकीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. बहुतांश असेट मॅनेजमेंट कंपन्या आणि बँका सलग तीन हफ्ते चुकल्यास एसआयपी रद्द करण्याची शक्यता असते. याचा प्रभाव तुमच्या संपूर्ण गुंतवणुकीवर होऊ शकतो. दुसरा तोटा म्हणजे, हप्ते न भरले गेल्यास कंपाऊंडिंगची साखळी तुटते. तसेच बाजारातील चढ-उतारानुसार कॉस्ट ॲव्हरेजिंगच्या संधी गमावल्या जातात. यामुळे रिटर्न कमी मिळतो. तसेच हा समतोल पुन्हा साधण्यासाठी भविष्यात मोठी गुंतवणूक करावी लागू शकते.

बँक पेनल्टी आणि चार्जेस : जर बँकेत पुरेसे पैसे नसल्यामुळे एसआयपीचा हफ्ता भरला गेला नसेल तर बँक इनसफिशिएंट फंडस् अंतर्गत दंड आकारू शकते. ही पेनल्टी चुकलेल्या प्रत्येक हफ्त्यांसाठी लागू होते. यामुळे अनावश्यक खर्च वाढतो. सतत ऑटो डेबिट फेल झाल्यास बँक याला नॉन-मेंटेनन्स समजू शकते आणि क्रेडिट स्कोअरवर नकारात्मक परिणाम होतो.

हे लक्षात घेता एसआयपी चुकू नये यासाठी काही गोष्टी आवर्जून लक्षात ठेवाव्यात.

१ **पुरेसे बँक शिल्लक ठेवा :** ज्या खात्याद्वारे एसआयपीचा हफ्ता कापला जातो त्या खात्यात नेहमी पुरेशी रक्कम ठेवा. हफ्त्याची तारीख येण्यापूर्वी खात्यातील शिल्लक तपासा.

२ **ऑटोमॅटिक रिमाइंडर सेट करा** : फोन किंवा कॅलेंडरवर हफ्त्याची तारीख ठेवा. यामुळे पैसे कापले जाण्याची आठवण राहते.

३ **उत्पन्नानुसार एसआयपी रक्कम ठरवा** : आपली कमाई आणि खर्च विचारात घेऊन एसआयपी रक्कम ठरवा. कारण जास्त रक्कम ठेवल्यास आर्थिक अडचणीच्या काळात, आपत्कालीन खर्च उद्‌भवल्यास हप्ता चुकण्याची शक्यता असते.

४ **बॅकअप अकाउंट ठेवा** : शक्य असल्यास दुसरे बँक खाते एसआयपीसाठी लिंक करा. जेणेकरून मुख्य खात्यात पैसे नसतील तर दुसऱ्या खात्यातून वर्ग केले जाऊ शकतात.

५ **फायनान्शियल परिस्थिती तपासा** : वेळोवेळी तुमची आर्थिक स्थिती तपासा आणि आवश्यक असल्यास एसआयपी रक्कम कमी करा.

६ **स्किप किंवा पॉज सुविधा वापरा** : काही काळ आर्थिक स्थिती अस्थिर असल्यास एसआयपी पॉज सुविधा वापरून हफ्ता थांबवता येतो. नंतर पुन्हा सुरु करता येतो.

### जर हफ्ता चुकला तर काय करावे?

१. **फंड हाऊसशी संपर्क करा :** एसआयपी हफ्ता चुकल्यास एएमसी किंवा डिस्ट्रीब्यूटरशी संपर्क साधा. काही प्रकरणांत ते मॅन्युअली जमा करण्याची परवानगी देऊ शकतात.

२. **एसआयपी रक्कम समायोजित करा :** सध्याची रक्कम जास्त वाटल्यास कमी करण्याचा विचार करा, कारण कमी करणे पूर्ण न भरण्यापेक्षा चांगले आहे.

३. **पुढील हफ्त्यासाठी तयार राहा :** पुढील हफ्त्याच्या दिवशी खात्यात पुरेशी रक्कम ठेवा. हफ्त्याच्या तारखेच्या दोन दिवस आधी शिल्लक तपासा.

## कर्जाबाबत बँकांना इशारा

ज्येष्ठ बँकर के व्ही कामत यांनी सध्याच्या परिस्थितीत बँकांनी रिटेल कर्ज पुरवठा जरा जपून करण्याची सूचना केली आहे. त्याचबरोबर विविध घटकांना दिल्या जात असलेल्या कर्जाच्या संतुलनाकडे लक्ष देण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बंगाल चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री या संस्थेच्या वतीने या विषयावर



आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना कामत यांनी सांगितले की, सध्या मोठ्या कंपन्या बँकाऐवजी इतर माध्यमातून भांडवल उभारणी करीत आहेत. आगामी काळातही मोठ्या कंपन्यांना बँकांकडून भांडवलाची फारशी गरज भासणार नाही. अशा परिस्थितीत रिटेल सेगमेंटमध्ये बँकांना व्यवहार करावे लागणार आहेत. या सेगमेंट बाबत बँकांनी सावध राहून व्यवहार करण्याची गरज आहे.

सध्या बँकांची अनुत्पादक मालमत्ता निचांकी पातळीवर आहे. मात्र हे प्रमाण कधीही हाताबाहेर जाऊ शकते. यासाठी बँकांनी निरंतर सावध राहण्याची आवश्यकता असते असे कामत म्हणाले.

सध्या जिओ फायनान्शिअल सर्व्हिसेसचे बिगर कार्यकारी अध्यक्ष असलेले कामत म्हणाले की अनामतीशिवाय दिलेल्या कर्जपरतफेडीवर कोणत्याही कारणामुळे कधीही नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता गृहीत धरून बँकांनी व्यवहार करण्याची गरज आहे.

त्यातच क्रेडिट स्कोर चांगला नसलेल्या ग्राहकांना फिनटेक कंपन्या कर्जपुरवठा करीत आहेत. या ग्राहकांना बँकांनी कर्ज दिल्यानंतर या कर्जाच्या परतफेडीवर दबाव येऊ शकतो. ते म्हणाले की. नागरिकांनी डेरिव्हेटिव्ह सेगमेंटमध्ये केलेल्या व्यवहारात १.७५ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. याच नागरिकांचे बँकांशीही संबंध असतात अशा परिस्थितीत संबंधित नागरिकांच्या कर्ज परतफेडच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

## घरभाड्याच्या पेमेंटवर आरबीआयची नवी अट

फिनटेक क्षेत्रातील दिग्गज फोनपे, पेटीएम आणि क्रेड यांनी घरभाडे क्रेडिट कार्डद्वारे भरण्याची सेवा बंद केली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) पेमेंट ॲग्रीगेटर्स (पीए) यांच्यासाठी नवे नियम जारी केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.




आरबीआयने जाहीर केलेल्या मास्टर डायरेक्शनमध्ये म्हटले आहे की, पेमेंट ॲग्रीगेटर फक्त ज्याच्यासोबत त्याचा करार झाला आहे अशा व्यापाऱ्याकरिता (मर्चंट) निधी गोळा करू शकतो. पीएचा व्यवसाय मार्केटप्लेससारखा चालू शकत नाही. यामुळे आता फिनटेक कंपन्या केवायसी प्रक्रियेनंतर व्यापारी म्हणून नोंदणीकृत नसणाऱ्या घरमालकांना पेमेंट करू शकणार नाहीत. हा नियम क्रेडिट कार्डद्वारे होणारे पीअर-टू-पीअर ट्रान्स्फर व्यापारी पेमेंटच्या स्वरूपात लपविण्यापासून रोखण्यासाठी आणण्यात आला आहे. क्रेडिट कार्डवरून भाडे भरण्याची पद्धत झपाट्याने लोकप्रिय होत होती. कारण वापरकर्ते या सेवांचा वापर करून कॅशबॅक किंवा रिवॉर्ड पॉइंट्स मिळवत होते.

**माहीत आहे?**

घरभाडे ईएमआयमध्ये रूपांतरित करून रोकड प्रवाह (कॅश फ्लो) सुलभ करत होते. पण नव्या नियमांनुसार निधी फक्त त्या व्यापाऱ्यांच्या बँक खात्यातच हस्तांतरित होऊ शकेल, ज्यांचे पूर्ण केवायसी व ड्यू डिलिजन्स झालेले आहे. त्यामुळे जे घरमालक औपचारिक व्यापारी प्रणालीचा भाग नाहीत, त्यांच्यासाठी ही सुविधा थांबली आहे.

उद्योगातील जाणकारांचे म्हणणे आहे की हा फक्त नियमांचा प्रश्न नाही, तर संपूर्ण पेमेंट प्रणालीचे स्वरूप बदलण्याचे पाऊल आहे. आरबीआयचे हे ऐतिहासिक पाऊल आहे. यामुळे नियमांची गुंतागुंत कमी झाली आहे. आता एकच पीए परवाना (लायसन्स) आवश्यक आहे आणि व्यवसाय विस्तारासाठी फक्त इंटिमेशन द्यावे लागेल. हे सूक्ष्म नियमांच्या ऐवजी तत्त्वाधारित चौकट (प्रिन्सिपल बेस्ड फ्रेमवर्क) निर्माण करणारे आहे. तसेच, व्यापाऱ्यांच्या ड्यू डिलिजन्सची जबाबदारी थेट पीएवर येते, बँकांवर नाही.


**ग्राहकांवर परिणाम**

आरबीआयच्या निर्णयामुळे आता घरभाड्यावर क्रेडिट कार्ड रिवॉर्ड्स मिळविण्याचा सोपा मार्ग संपुष्टात आला आहे. वापरकर्त्यांना त्यांचे मासिक भाडे बँक ट्रान्स्फर, युपीआय किंवा चेकद्वारे भरावे लागणार आहे. भविष्यात फिनटेक कंपन्या ही सेवा पुन्हा सुरू करू शकतात, पण त्यासाठी कठोर केवायसी प्रक्रिया आणि घरमालकांना व्यापारी म्हणून जोडावे लागेल. ही प्रक्रिया वेळखाऊ असून लहान घरमालकांसाठी आकर्षक ठरणार नाही. हा निर्णय डिजिटल पेमेंट क्षेत्रात कडक शिस्त व अनुपालन सुनिश्चित करण्याच्या आरबीआयच्या प्रयत्नांचा भाग आहे. मार्केटप्लेससारख्या पद्धतीने चालणाऱ्या रेंट पेमेंटला आळा घालून आरबीआय फसवणुकीचा धोका कमी करू इच्छित आहे आणि निधीच्या प्रवाहावर थेट नजर ठेवू पाहत आहे.

## एलआयसीची पॉलिसी घेताना

एलआयसीची पॉलिसी केवळ विमा संरक्षण देत नाही, तर बचत आणि गुंतवणुकीची संधी देखील उपलब्ध करून देते. ती तुमच्या कुटुंबाला आर्थिक सुरक्षितता देते आणि भविष्यासाठी निधी तयार करण्यास मदत करते. परंतु जर योग्य माहिती व सावधगिरीने गुंतवणूक केली नाही, तर पैसा अडकू शकतो आणि क्लेम मिळण्यात अडचणी निर्माण होतात.

**१. अपूर्ण किंवा चुकीची माहिती देणे** : अनेक लोक पॉलिसी घेताना आपली तब्येत, सवयी (धूम्रपान, मद्यपान) किंवा जुने आजार (मधुमेह, उच्च रक्तदाब)




लपवतात. त्यांना वाटते की त्यामुळे प्रीमियम कमी होईल. पण क्लेमच्या वेळी एलआयसी तपशीलवार वैद्यकीय व वैयक्तिक नोंदी तपासते. जर माहिती खोटी किंवा अपूर्ण आढळली, तर क्लेम थेट नाकारला जातो. म्हणून पॉलिसी घेताना नेहमी खरी व पूर्ण माहिती द्यावी. प्रीमियम थोडा जास्त भरावा लागला तरी क्लेम सुरक्षित राहतो.

**२. प्रीमियम वेळेत न भरणे** : बऱ्याचदा लोक पॉलिसीचा हप्ता नियोजित वेळेत भरत नाहीत. दीर्घकाळ असे घडत राहिल्यास पॉलिसी बंद (लॅप्स) होते. अशा वेळी विमा संरक्षण थांबते आणि क्लेम मिळत नाही. पॉलिसी पुन्हा सुरू करायची असेल, तर दंड व व्याज भरावे लागते. यासाठी प्रीमियमच्या तारखेचा रिमाइंडर सेट करावा किंवा स्वयंचलित भरणा (ऑटो डेबिट/ऑनलाईन पेमेंट) सुरू ठेवावा.

**३. चुकीची पॉलिसी निवडणे** : काही वेळा लोक आपल्या गरजा न समजता पॉलिसी घेतात. उदाहरणार्थ, फक्त विमा संरक्षणाची गरज असताना गुंतवणुकीसह पॉलिसी घेतली जाते. त्यामुळे रिटर्न कमी मिळते किंवा खरी गरज पूर्ण होत नाही. म्हणून जर फक्त विमा हवा असेल तर टर्म इन्शुरन्स घ्यावा आणि गुंतवणुकीसाठी एंडाव्हमेंट किंवा युनिट-लिंक्ड पॉलिसी निवडावी. यासाठी विश्वासार्ह सल्लागाराची मदत घ्यावी.


**४. नॉमिनीची चुकीची किंवा जुनी माहिती ठेवणे** : अनेक लोक नॉमिनीचे नाव देत नाहीत किंवा चुकीची/जुनी माहिती ठेवतात. क्लेमच्या वेळी यामुळे कुटुंबाला कायदेशीर अडचणी निर्माण होतात. म्हणून पॉलिसी घेताना नॉमिनीचे नाव, नाते आणि योग्य माहिती द्यावी. लग्न, घटस्फोट किंवा कुटुंबातील बदलांनुसार नॉमिनी अपडेट करणे अत्यावश्यक आहे.

**५. पॉलिसीच्या अटी न वाचणे** : लोक बहुतेक वेळा पॉलिसीच्या अटी-शर्ती नीट वाचत नाहीत. लॉक-इन कालावधी, सरेंडर व्हॅल्यू किंवा मधल्या काळात पॉलिसी बंद करण्याचे नियम न समजल्यामुळे नुकसान होते. सुरुवातीच्या वर्षांत काही पॉलिसींमध्ये परतावा फारच कमी मिळतो. म्हणून कागदपत्र नीट वाचा.

## पेंशनधारकांसाठी आनंदाची बातमी!

ऑक्टोबर २०२५ पासून सुपर सीनियर

पेंशनधारकांसाठी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट जमा करण्याची प्रक्रिया आता अधिक सुलभ झाली आहे. पेंशन आणि पेंशनर कल्याण विभाग नोव्हेंबर २०२५ मध्ये देशभरात डिजिटल लाइफ सर्टिफिकेट कॅम्पेन ४.० सुरू करणार आहे. यामध्ये फेस ऑथेंटिकेशन आणि घरपोच सेवा यांचा समावेश असेल. या मोहिमेत देशातील १,६०० जिल्हे आणि सब डिव्हिजनमध्ये पेंशनधारकांसाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. विशेषतः वृद्ध आणि दिव्यांग पेंशनर्ससाठी घरपोच सेवा दिली जाणार आहे. या उपक्रमात बँका आणि इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक सहयोग करतील. या मोहिमेमध्ये ८० वर्षांहून जास्त वय असलेल्या पेंशनर्ससाठी खास सोय केली आहे. ते ऑक्टोबर २०२५ पासून आपले लाईफ सर्टिफिकेट डिजिटल माध्यमातून जमा करू शकतात, ज्यामुळे त्यांच्या पेंशनमध्ये कोणताही अडथळा येणार नाही. पेंशन आणि पेंशनर कल्याण विभागाच्या ऑफिस मेमोरँडमनुसार, बँकांना १




पेंशनर्ससाठी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट सुविधा सुरू करावी लागेल.

फेस ऑथेंटिकेशनद्वारे लाइफ सर्टिफिकेट जमा करण्यासाठी पेंशनर्सना फक्त स्मार्टफोन आवश्यक आहे. प्रथम, आधार फेस आरडी ॲप्लिकेशन डाउनलोड करावे. नंतर 'जीवन प्रमाण ॲप' डाउनलोड करावे. या ॲपमध्ये ओपन केल्यावर 'ऑपरेटर ऑथेंटिकेशन' स्क्रीनवर आधार नंबर, मोबाईल नंबर आणि ईमेल पत्ता भरावा, सबमिट बटन दाबावे आणि ओटीपी नोंदवून प्रमाणीकरण पूर्ण करावे.

ओटीपी नंतर फेस स्कॅनसाठी स्क्रीन खुले होईल. फेस स्कॅन पूर्ण केल्यावर पेंशनरची माहिती भरावी लागेल, ज्यात आधारनुसार पूर्ण नाव, पेंशन प्रकार, प्राधिकरण, एजन्सीचे नाव, पीपीओ नंबर आणि पेंशन अकाउंट नंबर यांचा समावेश असेल. सर्व घोषणांवर क्लिक करून सबमिट केल्यावर अंतिम फेस स्कॅन होईल. यानंतर डिजिटल लाइफ सर्टिफिकेटचे तपशील स्क्रीनवर दिसतील, ज्यामध्ये आयडी आणि पीपीओ नंबर असेल.

सर्टिफिकेट डाउनलोड करण्यासाठी जीवन प्रमाणाच्या वेबसाइटवर लॉगिन करावे आणि आयडी टाकून डाउनलोड करावे. लक्षात ठेवा की ऑपरेटर ऑथेंटिकेशन फक्त एकदाच करावा लागतो. पेंशनर स्वतः ऑपरेटर होऊ शकतो आणि एक ऑपरेटर अनेक पेंशनर्सचे डिजिटल लाइफ सर्टिफिकेट तयार करू शकतो. ही सुविधा विशेषतः वृद्ध आणि दिव्यांग पेंशनर्ससाठी वरदान ठरेल, कारण त्यांना आता घरबसल्या सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने लाइफ सर्टिफिकेट जमा करता येईल. त्यामुळे पेंशनच्या प्रक्रियेत विलंब किंवा गैरसोय होण्याची शक्यता कमी होईल.

## 'बीमा सुगम'ने काय साधणार?

भारतातील विमा क्षेत्रात अभूतपूर्व अशी क्रांती घडवून आणणारी नवी सुरुवात नुकतीच झाली आहे. 'बीमा सुगम' या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला विमा घेणे, त्याचे नूतनीकरण करणे आणि दावा नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक व वेगवान होणार आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा (डीपीआय) महत्त्वाचा भाग म्हणून याचा समावेश करण्यात आला असून; 'सर्वांसाठी विमा २०४७' या राष्ट्रीय ध्येयाशी याची सांगड घालण्यात आली आहे.

**एकाच छताखाली सर्व विमा सेवा**

'बीमा सुगम' या संकल्पनेचा पाया अत्यंत सोपा आहे. जीवनविमा, आरोग्यविमा, वाहनविमा, प्रवासविमा, मालमत्ता विमा किंवा शेतीसंबंधित विमा यांसारख्या सर्व गरजा आता एका डिजिटल व्यासपीठावर पूर्ण होणार आहेत. पॉलिसी घेण्यापासून ते तिचे व्यवस्थापन आणि दावा मंजुरीपर्यंत प्रत्येक टप्पा या प्लॅटफॉर्मवर होणार आहे. एवढेच नव्हे, तर नागरिकांची कागदपत्रेही या पोर्टलवर सुरक्षितरीत्या संग्रहित राहतील.

या प्लॅटफॉर्मची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे पारदर्शकता व कमी खर्च. खासगी विमा कंपन्यांच्या तुलनेत येथे कमिशन आणि शुल्क अत्यल्प ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे ग्राहकांना परवडणाऱ्या दरात सर्व सेवा उपलब्ध होणार आहेत. युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) ने डिजिटल पेमेंट क्षेत्रात क्रांती घडवली, तसेच 'बीमा सुगम' विमा क्षेत्रासाठी एक सक्षम डिजिटल पायाभूत सुविधा ठरणार आहे.

या प्लॅटफॉर्मची कार्यवाही टप्प्याटप्प्याने सुरू होणार आहे. सुरुवातीला हे केवळ माहिती देणारे आणि मार्गदर्शन करणारे माध्यम म्हणून काम करेल. पुढील काही महिन्यांत विमा कंपन्या व विविध भागीदार पूर्ण क्षमतेने जोडले गेल्यानंतर पॉलिसी खरेदी, नूतनीकरण व दावा नोंदणीसारख्या सर्व सुविधा उपलब्ध होतील. या धीम्या गतीने सुरुवात करण्यामागील उद्दिष्ट म्हणजे विमा क्षेत्राला नव्या प्रणालीशी जुळवून घेण्याची पुरेशी संधी मिळावी.

ग्राहकांच्या दृष्टीने 'बीमा सुगम' अनेक अर्थांनी फायदेशीर ठरणार आहे. विविध कंपन्यांच्या योजनांची तुलना करून योग्य योजना निवडणे सोपे होईल. दावा नोंदणी आणि त्यावरील कार्यवाही जलदगतीने होईल. किमान खर्च, पारदर्शक पद्धती आणि एकाच ठिकाणी सर्व पर्याय उपलब्ध असणे ही याची मोठी वैशिष्ट्ये आहेत.




'बीमा सुगम' ही केवळ खरेदी-विक्रीची बाजारपेठ नाही, तर विमासंबंधी माहिती व डेटाचा केंद्रीकृत भांडार आहे. भविष्यात नवे विमा उत्पादने बाजारात येताच ती तत्काळ या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होतील. यामुळे विमा क्षेत्र अधिक लवचिक, ग्राहकाभिमुख व नवोन्मेषी होणार आहे.

या व्यासपीठामुळे विमा घेण्याची पद्धत मूलभूत स्वरूपात बदलणार आहे. देशातील प्रत्येक नागरिकासाठी विमा अधिक सुलभ, परवडणारा आणि विश्वासार्ह होणार आहे. डिजिटल व वित्तीय सक्षमीकरणाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, २०४७ पर्यंत 'सर्वांसाठी विमा' या राष्ट्रीय ध्येयाच्या पूर्ततेसाठी हे नवे पर्व निर्णायक ठरणार आहे.

## जीएसटी घटूनही महसूल कायम

केंद्र सरकार व आणि राज्य सरकारने समन्वयाने जवळजवळ ४०० वस्तूंवरील वस्तू आणि सेवाकरात म्हणजे जीएसटीत भरघोस कपात केली आहे. मात्र तरीही यामुळे एकूण जीएसटी संकलनावर जास्त परिणाम होणार नाही. केंद्र सरकारची किंवा राज्य सरकारची तूट यामुळे वाढणार नाही असे मत बऱ्याच पतमानांकन संस्थांनी व्यक्त केले आहे. आता



क्रिसिल या संस्थेने सांगितले की कर कपातीमुळे महसुलावर जास्त परिणाम होणार नाही. यासंदर्भात या संस्थेने जारी केलेल्या टिपणात म्हटले आहे की, सरलेल्या आर्थिक वर्षात एकूण जीएसटी संकलन १०.६ लाख कोटी रुपये होते. अर्थ मंत्रालयाने स्वतः केलेल्या मूल्यांकनानुसार चालू आर्थिक वर्षात कर कपातीमुळे जीएसटी संकलनावर ४८ हजार कोटी रुपयांचा परिणाम होऊ शकतो. जरी ही आकडेवारी गृहीत धरली तरी १०.६ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ४८ हजार कोटी ही रक्कम अत्यल्प आहे. शिवाय किमती कमी झाल्यामुळे विक्री वाढून जीएसटी संकलनात काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता खुली आहे.

प्राप्तिकर उत्पन्न मर्यादित झालेली वाढ आणि विविध वस्तू आणि सेवा वरील कमी झालेला कर यामुळे नागरिकाकडील अतिरिक्त उत्पन्न वाढेल. त्यामुळे त्यांची क्रयशक्ती वाढेल. अशा परिस्थितीत जीएसटी संकलन वाढण्यास मदत होणार आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत त्याचे अचूक मूल्यांकन केले जाऊ शकणार नाही. मोबाईल टेरिफसारख्या वेगाने वाढणार्‍या सेवावरील कराच्या दरात बदल केलेला नाही. त्याचबरोबर ई-कॉमर्स डिलिव्हरी सारख्या सेवावर आता अठरा टक्के इतका कर लावण्यात आलेला आहे. त्यामुळे कर संकलनातील तूट भरून निघण्यास मदत होणार आहे.



केडगाव येथील रेणुकामाता मंदिरात प्रविण कोतकर व ज्योती कोतकर तसेच विजय सुंबे व मोहिनी सुंबे यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली.

# केडगावच्या रेणुका माता मंदिरात उत्साहात घटस्थापना

नगर – नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने केडगाव येथील श्री रेणुका माता देवी मंदिरात घटस्थापना व महाआरतीचा सोहळा अतिशय धार्मिक वातावरणात पार पडला. या वेळी मंदिर परिसर भक्तांच्या जयघोषाने, ढोल–ताशांच्या गजराने आणि फुलांच्या सजावटीने दुमदुमून गेला. हा सोहळा प्रवीण कोतकर व ज्योती कोतकर तसेच विजय सुंबे, मोहिनी सुंबे कुटुंबियांच्या वतीने संपन्न झाला. ग्रामस्थ व भाविक उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले.

या प्रसंगी प्रवीण कोतकर म्हणाले की, केडगाव येथील रेणुका माता देवी हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. हे मंदिर नवसाला पावणारे असून या ठिकाणी नवरात्रोत्सव काळात हजारो भाविक दर्शनासाठी येतात. यंदा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे व त्यांना धीर मिळावा यासाठी आम्ही रेणुका मातेला प्रार्थना केली आहे, असे ते म्हणाले.

नवरात्रोत्सव निमित्त मंदिरात दररोज महाआरती, देवीची पालखी सोहळा, भजनी मंडळाचे आयोजन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन होणार असून, भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

# आईराजा उदो उदो... जयघोषात बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात झाली घटस्थापना

## भक्तिपूर्ण वातावरणात भाविकांची दर्शनासाठी रीघ

नगर – बुऱ्हाणनगर ता.नगर येथील पुरातन कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिरात सोमवारी सकाळी रिमझिम पावसात नवरात्रौत्सवास भक्तिपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. यानिमित्ताने मंदिरातील तुळजाभवानी देवीची सकाळी महापूजा, अभिषेक करून ध्वजारोहणा करून विधिवत घटस्थापना देवीचे पुजारी भगत कुटुंबीयांनी केली. 'आईराजा उदो उदो...सदानंदीचा उदो उदो..., तुळजाभवानी देवी की जय... असा देवीचा जयघोष उपस्थित भाविकांनी केला. शारदीय नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या दर्शनास भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली आहे.



शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवीच्या मंदिरात विधिवत घटस्थापना करताना मंदिराचे मुख्य पुजारी अ‍ॅड.विजय भगत व अ‍ॅड.अभिषेक भगत. यावेळी दुर्गा भगत, किरण व सुभाष भगत आदी.

घटस्थापणे पूर्वी पुजारी भगत परिवारातील महिलांनी डोक्यावर सजवलेले घट व पुरुषांनी भगवे ध्वज, अबकारी हातात घेत तुळजाभवानी देवीचा जयजयकार करत मंदिराला प्रदक्षिणा मारली. या प्रदक्षिणे नंतर मंदिराचे मुख्य पुजारी अ‍ॅड.विजय भगत, सौ.दुर्गा भगत, अ‍ॅड.अभिषेक भगत व कुणाल भगत यांनी मंदिरात विधिवत घटस्थापना करून देवीची महाआरती केली. नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी देवीची मूर्ती सुवर्ण अलंकारांनी मढण्यात आली होती. तसेच विविध फुलांच्या माळांनी देवीचे रूप अधिकच प्रसन्न वाटत होते.

शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर परिसरातही सजावट करण्यात आली आहे. देवीच्या मुखदर्शनाची वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. दिवसातील २१ तास भाविकांना देवीचे दर्शन घेता येणार आहे. नवरात्रोत्सवा निमित्त पुढील १० दिवस भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तुळजाभवानी देवीचे दर्शन श्री बुऱ्हाणनगर देवी या पेजवर सर्व समाज माध्यमांवर उपलब्ध आहे, अशी माहिती मंदिराचे पुजारी अ‍ॅड.अभिषेक भगत यांनी देवून भाविकांनी येथील धार्मिक कार्यक्रमांचा व देवीच्या दर्शनचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

तुळजाभवानी देवीच्या दैनंदिन पुजेची माहिती कुणाल भगत यांनी दिली. यावेळी राजेंद्र भगत, अंजली भगत, किरण भगत, मनीषा भगत, सुभाष भगत, सुनंदा भगत, कविता भगत, ऋषिकेश भगत, अ‍ॅड.अजिंक्य भगत, वैभवी भगत, अंकिता भगत, अ‍ॅड. संकेत भगत, अक्षदा भगत, क्षताक्षी व वेद भगत वेद भगत आदींसह भाविक उपस्थित होते.



पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा–कृष्ण मंदिरात घटस्थापना.

# पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा–कृष्ण मंदिरात घटस्थापना

## २३ सप्टेंबर रोजी माता की चौकी, तर १ ऑक्टोबरला पुर्णाहूती यज्ञ

नगर – पंजाबी सनातन धर्मसभेच्या सर्जेपुरा येथील राधा–कृष्ण मंदिरात विधीवत पूजा करुन २२ सप्टेंबर रोजी सकाळी उत्साहात घटस्थापना करण्यात आली. नवरात्र उत्सवानिमित्त राधा–कृष्ण मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता व सर्व विश्वस्तांच्या हस्ते घटस्थापना झाली. यावेळी उपस्थित असलेल्या शीख, पंजाबी भाविकांनी देवीचा जयघोष केला. गेल्या ५९ वर्षापासून मंदिरात नवरात्र उत्सवानिमित्त घटस्थापना करुन विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वर्षी दररोज महिला मंडळाच्या वतीने संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत किर्तन होणार आहे. तर दररोज संध्याकाळी ७ वाजता मातेची आरती होणार आहे. नवरात्रनिमित्त मंदिरामध्ये आकर्षक फुलांची सजावट करुन विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

२३ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता माता की चौकीचा कार्यक्रम होणार आहे. बबलू दुग्गल जागरण मंडळीचे कलाकार देवीचे भक्तीगीत सादर करणार आहे. यानंतर यजमान योगेश धुप्पड परिवाराच्या वतीने आरती होणार असून, आरतीनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ९:३० वाजता महिला भजन मंडळीच्या उपस्थितीमध्ये पूर्णाहुती यज्ञ होणार आहे. या कार्यक्रमात भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन राधा–कृष्ण मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# गौरीशंकर मित्र मंडळ (ट्रस्ट) येथे नवरात्र उत्सवानिमित्त घटस्थापना

## शहर विकासाचे तुळजाभवानी मातेला वसंत लोढा यांचे साकडे

नगर – गौरी घुमट येथील गौरीशंकर मित्र मंडळ ट्रस्ट च्यावतीने शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त तुळजाभवानी मातेच्या मंदिरात भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा व माजी नगराध्यक्ष लता लोढा यांच्या हस्ते विधिवत पूजन करून घटस्थापना करण्यात आली. व देवीची महाआरती करण्यात आली. याप्रसंगी सागर शिंदे, संजय वल्लाकट्टी, रवींद्र चवंडके, राजेंद्र गायकवाड, संदीप शिंदे, जयेश शिंदे, रोहन चंगेडिया, अथर्व शिंदे, बाळासाहेब खताडे, विजयकुमार शिंदे, गौरी शिंदे, नीता शिंदे, स्वाती शिंदे, सुशीला शिंदे, श्रद्धा शिंदे, तेजस्वी यादव आदींसह उपस्थित होते.



गौरीशंकर मित्र मंडळ (ट्रस्ट) येथे नवरात्र उत्सवानिमित्त घटस्थापना करण्यात आली.

सर्वत्र शारदिय नवरात्र उत्सव आनंदाने साजरा होत आहे. आई तुळजाभवानी ही शक्ती देणारी देवता आहे. ज्याप्रमाणे छत्रपती शिवरायांना अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी देवी मातेने तलवार दिली होती. त्याचप्रमाणे शहर विकासासाठी हे माते तू बळ दे. अशी मागणी वसंत लोढा यांनी केली आहे. थोड्याच दिवसांनी महानगरपालिकेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत शहर विकासाचा ध्यास घेणाऱ्या उमेदवारांना देवी माता शक्ती प्रदान करो. ही प्रार्थना आई तुळजाभवानी चरणी करण्यात आली आहे.

# नवरात्रीनिमित्त अहिल्यानगर महापालिकेकडून केडगाव देवी मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम

## मंदिरापर्यंत येण्याजाण्याच्या रस्त्यावरही कर्मचाऱ्यांकडून साफसफाई, स्वच्छता

नगर – शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिकेने केडगाव येथील देवी मंदिर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला. मंदिराकडे येणाऱ्या रस्त्यांची व रस्त्यालगतच्या परिसराची साफसफाई व स्वच्छता करण्यात आली. नवरात्रोत्सवात भाविकांना अडचणी येऊ नयेत, या दृष्टीने देवी मंदिर मार्गावरील नादुरुस्त पथदिवे दुरुस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.



शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिकेने केडगाव येथील देवी मंदिर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला. (छाया : लहू दळवी)

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर केडगाव देवी मंदिरात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन उपाययोजना करण्यात येत आहेत. मंदिराकडे येणाऱ्या रस्त्यांवर काही ठिकाणी कचरा साचलेला होता. स्वच्छता मोहिमेअंतर्गत मंदिर परिसर व रस्त्यालगतचा हरित कचरा, प्लास्टिक कचरा व इतर कचरा उचलण्यात आला व परिसर स्वच्छ करण्यात आला. या मार्गावरील इतर आवश्यक कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विशेषतः मंदिराकडे येणाऱ्या रस्त्यांवर पथदिव्यांची तपासणी करून बंद पथदिवे तत्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले असल्याचेही यशवंत डांगे यांनी सांगितले.

दरम्यान, स्वच्छता सेवा पंधरवाडा अंतर्गत माळीवाडा बसस्थानक परिसरात महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. नागरिकांच्या सहकार्यातून बसस्थानक परिसरात पडलेला कचरा, प्लॅस्टिक कचरा उचलून बसस्थानक परिसरात स्वच्छता करण्यात आली. २ ऑक्टोबर पर्यंत हे अभियान सुरू असून, नागरिकांनीही यात सहभागी व्हावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# सारसनगर रामदेवरा दरबारात नवरात्र निमित्त २ ऑक्टोबरपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन

नगर – श्री रामदेवरा दरबार, सारसनगर येथे राजस्थान येथील प्रमुख देवता श्री रामदेवजी, श्री सालसर हनुमानजी व सच्चीयाय माता या देवता स्थापित आहेत. सालाबादप्रमाणे शारदीय नवरात्रोत्सव निमित्त २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २२ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता पंचामृत पूजन, अभिषेक, सकाळी ९ वाजता घटस्थापना एवं दीपप्रज्वलन, रात्री ९ वाजता माता की चौकी कार्यक्रम नितीन निंबाळकर व सहकलाकार सादर करतील. २३ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता महाआरती तसेच भजन संध्या संकटमोचक हनुमान सत्संग मंडळ रामदेवरा दरबार सादर करणार आहे. २४ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता भजनसंध्या प्रस्तुती सौ.मयुरी चंगेडिया तर २५ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता भजनसंध्या गायक पंडित शर्मा (रामवाला) तसेच सी.ए.सागर शर्मा सादर करणार आहे.



२६ सप्टेंबर रोजी रात्री ७ ते ११ पर्यंत रास दांडिया डी. जे.निशांत चंगेडिया सादर करणार आहे. २७ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता भजनसंध्या चा कार्यक्रम जय मातादी महिला मंडळ करणार आहे. २८ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता भजनसंध्या सौ. दीपाली सुराणा ह्या सेवा देणार आहेत, २९ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता कु.वैदही बोरा, ३ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता नवदिन का सार नवचंडी दुर्गा होमहवन व रात्री १ वाजता होमहवन पूर्णाहुती, १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. कुमारिका पुजन, महाप्रसाद एवं महाआरती, रात्री ९ वाजता भजनसंध्या कु.नेहा बाफना सादर करणार आहे. २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता विजयादशमी निमित्त सीमोल्लंघन होणार आहे. भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री रामदेव भक्त मंडळ ट्रस्ट तर्फे आले आहे.

# नागापूरच्या रेणुकादेवी मंदिरात नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी



निंबळक – अहिल्यानगर तालुक्यातील नागापूर, निंबळक रोड वरील एमआयडीसी परिसरातील रेणुकादेवी मंदिरात रेणुका देवीच्या माहूरगड येथील देवीसारखाच तांदळ्याची प्राणप्रतिष्ठा झाली. त्यानंतरचा पहिला शारदीय नवरात्रोत्सव यंदा उत्साहात साजरा करण्याची तयारी सुरु झाली आहे. २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या १० दिवसांत सकाळ, दुपार व संध्याकाळ अशा तिन्ही प्रहरी धार्मिक कार्यक्रम होणार आहे. पहाटे आरती व प्रदक्षिणा, दुपारी भजन, कीर्तन, जप व प्रवचन, तर संध्याकाळी संगीतमय पूजा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. सातव्या माळेला देवीची यात्रा भरणार असून ३० सप्टेंबरला अष्टमी होम, १ ऑक्टोबरला पूजा तसेच २ ऑक्टोबरला दसर्याच्या दिवशी जागरण गोंधळ व रावण दहन होणार असून सांगता सोहळा होणार आहे.

उत्सवात धार्मिकतेसोबतच सामाजिक उपक्रम सुद्धा केले जाणार आहेत. यामध्ये रक्तदान शिबीर, रोपवाटप, शालेय साहित्य वाटप, अनाथाश्रमात अन्नदान यांचा समावेश आहे. संपूर्ण मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली असून, या ठिकाणी विविध दुकाने थाटण्यात आले आहेत. पहिल्या माळेपासूनच पंचक्रोशीतील भावीकांना दर्शन घेण्यात कोणतीही अडचण येणार नाही अशी सोय देवस्थान ट्रस्ट कडून करण्यात आली आहे. संपूर्ण नवरात्र उत्सवात रेणुका देवीचे मुख्य पुजारी गंगाधर तुकाराम वाकळे, बाबासाहेब भाऊसाहेब वाकळे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, लक्ष्मण गव्हाणे, बाळासाहेब भुतकर, गोरख चांदबुडे, साहेबराव भोर, दत्तात्रेय विटेकर, एकनाथ वाघ, राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, अजित वाकळे, वैभव आडोळे, अमोल बारस्कर, संजय कातोरे, गणेश कातोरे, महेश सप्रे व देवस्थान ट्रस्ट चे सर्व पदाधिकारी व एमआयडीसी पोलीस स्टेशन मधील पोलीस शिपाई उपस्थित राहून भाविकांना सहकार्य करणार आहेत.

# घटस्थापना : नवरात्रातील शक्तीचा जागर

भारत हा सण–उत्सवांचा देश म्हणून जगभर ओळखला जातो. प्रत्येक प्रांत, प्रत्येक भाषाभाषी लोक आपल्या परंपरेनुसार वर्षभर विविध उत्सव साजरे करतात. त्यामधील नवरात्र हा उत्सव अत्यंत महत्वाचा, लोकप्रिय आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून सुरू होणारे हे नवरात्र म्हणजे नऊ दिवसांचा देवीचा उत्सव होय. या नऊ दिवसांत देवी दुर्गेच्या विविध रूपांची उपासना केली जाते.



नवरात्रातील पहिले पाऊल म्हणजे घटस्थापना. प्रतिपदेच्या दिवशी शुभ मुहूर्तावर कलशाची स्थापना केली जाते. पवित्र जमिनीत ज्वारी अथवा गहू पेरले जातात. त्यावर पाणी घालून त्यांचे रोप वाढवले जाते. हा घट म्हणजे शक्तीचा, उर्जेचा आणि सृष्टीच्या अखंड चक्राचा प्रतीक मानला जातो. घटस्थापनेनंतर घराघरांत आणि मंदिरांत नवरात्रोत्सवाची सुरूवात होते.

नवरात्र हे केवळ धार्मिक नसून सांस्कृतिक दृष्ट्याही अत्यंत महत्वाचे मानले जाते. महाराष्ट्रात देवीचे जागरण, गोंधळ, भजन, कीर्तन, तसेच विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. गुजरातमध्ये गरबा आणि डांडिया रास या नृत्यप्रकारांमुळे नवरात्राची रात्र रंगते. दक्षिण भारतात घराघरांत गोलू म्हणून बाहुल्यांची मांडणी केली जाते. अशा प्रकारे भारतातील विविध प्रांतांत या उत्सवाला वेगवेगळे रंग दिसतात, पण श्रद्धा एकच – आदिशक्तीची आराधना.

नवरात्राच्या नऊ दिवसांत प्रत्येक दिवशी देवीच्या एका रूपाची पूजा केली जाते. शैलपुत्रीपासून सिद्धिदात्रीपर्यंतच्या नऊ रूपांतून देवी शक्ती, पराक्रम, विद्या, संपत्ती, संयम व भक्ती यांचे प्रतीक म्हणून उभी राहते. या उत्सवामागे संदेश आहे – वाईटावर चांगल्याचा विजय, असत्यावर सत्याचा विजय. महिषासुरासारख्या दुष्टाचा पराभव करून दुर्गामातेने प्रजेचे रक्षण केले, ही कथा आपल्याला संकटांचा सामना धैर्याने करण्याची प्रेरणा देते.

नवरात्राचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उपवास व साधना. अनेक भक्त या काळात सात्विक आहार घेतात, उपास करतात आणि मनाला संयमित ठेवतात. यामुळे शरीरशुद्धी तर होतेच, पण मन आणि बुद्धीही शुद्ध व शांत राहते. सध्या जिथे जीवनशैली धावपळीची आहे, तिथे नवरात्र हे आत्मपरीक्षण व अध्यात्माकडे वळण्याची संधी देऊन जाते.

नवरात्राच्या शेवटच्या दिवशी येते दसरा. विजया दशमी हा दिवस सत्य, न्याय आणि सदाचार यांचा विजय साजरा करण्याचा आहे. या दिवशी शमीची पाने सुवर्ण मानून एकमेकांना दिली जातात. यातून मैत्री, सौहार्द आणि एकोप्याचा संदेश मिळतो.

अशा रीतीने नवरात्र हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्ये जपणारा उत्सव आहे. घटस्थापना करून सुरू होणारा हा सोहळा भक्तांच्या जीवनात ऊर्जा, आनंद आणि नवा उत्साह आणतो. देवीची आराधना आपल्याला हे शिकवते की शक्तीचा उपयोग नेहमी समाजहितासाठी करावा. आजच्या युगातही हा संदेश तेवढाच आवश्यक आहे.

नवरात्रोत्सवातून मिळणाऱ्या या प्रेरणा आपण प्रत्यक्ष जीवनात उतरवल्या, तर नवरात्र साजरे करण्याचा खरा अर्थ साधला जाईल.

**– संदीप बांगर (शिक्षक)**
श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे, ता.राहुरी जि.अहिल्यानगर. ९६५७२२३३११

